

९८५३
म. ग्रं. सं. ठाणे
विषय इतिहास
स. नं. ८२०

# भारत असा लढला ! १

# [illegible]वीण स्वातंत्र्य [illegible]णा मिळाले ?

REFBK-0008061

पुरुषोत्तम रामचंद्र लेले

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ-सदन
गिरगांव, मुंबई

# भारत असा लढला

REFBK-0008061

भारताची हजारों वर्षांची तेजस्वी स्वातंत्र्याची परंपरा साडेसातीच्या फेऱ्यांतून आतां बाहेर पडली आहे. साडेसाती म्हणजे दिव्य. तें दिव्य भारतानें कसें केलें हें तरुण पिढीला समजावें म्हणून ह्या मालेची योजना.

दा. क्र. 6049

भारत असा लढला १


# प्राचीन स्वातंत्र्य

लेखक - पुरुषोत्तम रामचंद्र लेले

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ - सदन
गिरगांव, मुंबई



# बोना खिलौने?



मूल्य एक रुपया



रेखाचित्रें
गोलिवडेकर
आणि ओके

मुखपृष्ठ
द. ग. गोडसे
शं. तु. माळी

ब्लॉक्स : कर्नाटक
प्रोसेस स्टूडियो
चिराबाजार, मुंबई







मुद्रक : बा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक : के. भि. ढवळे
कर्नाटक हाउस
चिराबाजार, मुंबई २

सर्वाधिकार प्रकाशकाधीन
पहिली आवृत्ति
१४ नोव्हेंबर १९५३

९५९५८
२८।११।५३

स्वातंत्र्याचा वारसा आजच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या वडील पिढीपासून मिळाला आहे. आजचा काल प्रकाशाचा असला तरी अजून पुरेसा तेजस्वी प्रकाश पडलेला नाहीं. आज पारतंत्र्याचा अंधार नाहींसा झाला आहे, पण अन्य ढगांनीं अजून आकाश व्यापलेलें आहे. ते सर्व ढग नाहींसे करून आजच्या विद्यार्थ्यांनीं भारताचें भवितव्य उज्ज्वल केलें पाहिजे.

पराक्रमी पूर्वजांच्या स्वार्थत्यागाइतकें स्फूर्तिदायक दुसरें काय असूं शकेल? त्यांच्यासारखाच पराक्रम करून आजच्या तरुण पिढीनें हिंद मातेचे पांग फेडावे एवढीच त्या सर्वेश्वरापाशीं प्रार्थना आहे.



ताराबाग, मुंबई ४
१४ नोव्हेंबर, १९५३

पु. रा. लेले

स्वातंत्र्य-प्रेमाची अमरज्योत . . . . १
मूर्तिमंत संग्राम . . . . . . . . . . . १५
हळदीघाट . . . . . . . . . . . . . . २०
सूर्योदय . . . . . . . . . . . . . . . ३०
चलो दिल्ली . . . . . . . . . . . . . ४१
ग्वाल्हेरमध्यें हिंदीराज्य . . . . ४७
ऐशीं वर्षांचा लढवय्या . . . . . ५३
क्रांतिदेवी लक्ष्मीबाई . . . . . . ५७
सेनापति तात्या टोपे . . . . . . ६२
दगलबाजीची कीड . . . . . . . ६७
मरणांत खरोखर जग जगतें . . ७०

## भारत असा लढला : १

# रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले?







मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ८०५१



# स्वातंत्र्य-प्रेमाची अमरज्योत



मनुष्य प्राणिसृष्टीमध्यें स्वतःला अद्वितीय समजतो आणि कांहीं अंशीं त्याचा तो समज खराही आहे. पण मनुष्याप्रमाणें दरेक प्राणिमात्राला परमेश्वरानें जीवन धारण करण्याच्या शक्तीबरोबरच स्वातंत्र्याची आवड आणि त्यासाठीं धडपडण्याची शक्ति दिली आहे.

कोण्या एका काळीं एका राजकन्येला पोपट बाळगण्याची हौस वाटली. पोपटासाठीं हिऱ्यामोत्यांनीं मढवलेला सोनेरी पिंजरा तिनें तयार करविला आणि आपल्या नोकरांना एक सुंदर पोपट पकडून आणण्याची आज्ञा केली. एक नोकर एक सुंदर पोपट घेऊन आला. त्याला पाहून राजकन्येस अतिशय आनंद झाला.

त्या पोपटाची सर्व व्यवस्था ती जातीनें पाहूं लागली. सुंदर ताजीं फळें, उंची मेवामिठाई, नानाप्रकारचे सुगंध मिसळून तयार केलेलें पाणी, अशा प्रकारची बादशाही तैनात त्याला मिळूं लागली. पिंजऱ्यांत राहून, पुढें पडेल तें पोटांत घालून, खुशालींत आपलें जीवन घालवणारे पोपट राजकन्येनें पाहिलेले असल्यामुळें आपला पोपट त्याला लाभलेल्या

वैभवानें मोहित होऊन पिंजऱ्यांत नाचत बागडत राहील अशी तिची कल्पना होती, ती खोटी ठरली. तो पोपट अंग धरण्याऐवजीं दिवसेंदिवस खंगत चालला. त्या सोनेरी पिंजऱ्यांत त्याला बसण्यासाठीं जी मूल्यवान चमकणारी दांडी होती तिच्यावर तो बसेना. राजकन्येनें आपल्या हातानें डाळिंब फोडून त्याच्या पुढें कौतुकानें ठेवलेले दाणे तो खाईना. राजकन्येनें सोनेरी पेल्यांत सुगंधमिश्रित पाणी त्याच्या पुढें ठेवलें त्यांत चोंच बुडवायलासुद्धा तो तयार होईना.

त्या पोपटाला जंगलांतलें स्वातंत्र्य प्रिय होतें. मन मानेल तशा भराऱ्या माराव्यात, इच्छेला येईल त्या झाडावर बसून मनसोक्त फळें खावींत, ओढ्यांत स्वाभाविकपणें वाहाणारें पाणी प्यावें, असें त्याचें जीवन होतें. त्याची त्याला आठवण होत असे. त्याला तें पिंजऱ्यांतील जीवन सहन होईना. अखेरीस त्या पिंजऱ्याच्या कठड्यावर डोकें आपटून त्यानें आपल्या आयुष्याचा अंत करून घेतला.

पोपटाची जर अशी भावना, तर स्वातंत्र्यासाठीं आणि प्रगतीसाठीं देवानें ज्याला जन्माला घातलें त्या माणसाची स्वातंत्र्यप्रीति किती जोरदार असेल बरें ! एका व्यक्तीच्या स्वातंत्र्याला जो नियम लागू तोच माणसांच्या समूहालाही लागू आहे. स्वातंत्र्याला जो मनुष्य किंवा समाज मुकतो त्याची स्थिति वरील पोपटासारखीच होते. मरण पत्करलें पण ही गुलामगिरी नको अशा विचारानें त्याच्या वृत्ति बेभान होऊन जातात



डोकें आपटून त्यानें आपल्या आयुष्याचा अंत करून घेतला.

३.६२०

आणि गुलामगिरीच्या यातनांपेक्षां मृत्यूच्या यातनांना कवटाळण्यास तो आनंदानें तयार होतो.

हें खरें आहे कीं ज्या देशाच्या नशिबीं गुलामगिरी आलेली असते त्या देशांतील पुष्कळ लोक सर्वसाधारण पोपटांसारखेच असतात. गुलामगिरीची त्यांना तितकीशी खंत वाटत नाहीं इतकेंच नव्हे तर ज्यांनीं त्यांच्या देशाच्या मानेभोवतीं गुलामगिरीचा पाश आवळला त्यांच्या तालावर नाचून त्यांच्या ताटाखालचीं मांजरें बनण्यांत भूषण मानण्याइतके कांहीं लोक नादान बनलेले असतात. पण अशा देशांत, स्वातंत्र्य मिळेपर्यंत अन्नपाणी ज्यांना गोड लागत नाहीं, अशा स्वातंत्र्यभक्तांची वाण असते असें मात्र मुळींच नाहीं. अनुकूलतेच्या किंवा साधनसामुग्रीच्या अभावामुळें स्वतंत्रतादेवीचे हे निस्सीम उपासक वरून स्वस्थ दिसत असले तरी अनुकूल काळ प्राप्त होतांच ते उसळी मारल्याशिवाय राहात नाहींत.

आपल्या हिंदुस्थान देशाचाच इतिहास पाहा. गेलीं कित्येक शतकें कोणाच्या ना कोणाच्या गुलामगिरींत तो खितपत पडलेला होता. मुसलमान आक्रमकांचें ह्या देशांत पहिलें पाऊल पडलें तें लूटमारीच्या निमित्तानें. ह्या देशांत नांदत असलेल्या वैभवानें ते लालचावले म्हणून. त्या काळीं ह्या देशांत हिंदु राजेच राज्य करीत होते पण त्यांच्यांत संघटना नव्हती, उलट हेवेदावे मात्र भरपूर प्रमाणांत होते. शेजाऱ्याविरुद्ध कारवाई करतांना परक्याची मदत घेण्यास त्यांना कांहीं लाज वाटत नसे किंवा ह्या आपल्या




आक्रमकांचें ह्या देशांत पहिलें पाऊल पडलें तें लूटमारीच्या निमित्तानें.

कृत्याचा काय घोर परिणाम होईल ह्याचा विचारही त्यांच्या मनाला शिवत नसे. म्हणून आक्रमक मुसलमानांना ह्या देशांत आपले हातपाय पसरण्यास चांगली संधि मिळाली आणि त्या संधीचा त्यांनीं पुरेपूर उपयोग करून घेतला. दिल्लीच्या तख्तावर मुसलमान राजे मोठ्या डौलानें विराजमान झाले.

पण राणा संग्रामसिंह, महाराणा प्रतापसिंह, छत्रपति शिवाजीमहाराज अशांसारख्या नरवीर स्वातंत्र्योपासकांनीं आक्रमकांची खात्री पटवून दिली कीं हा देश कायमचा पारतंत्र्यांत जखडलेला राहाणार नाहीं.

त्यानंतर डच, पोर्तुगीज, फ्रेंच व इंग्रज हे युरोपिअन लोक सफरीच्या व व्यापाराच्या निमित्तानें भारतांत आले. पोर्तुगीज व फ्रेंच लोकांनीं एतद्देशीयांच्या आपसांतील दुहीचा फायदा घेऊन ठिकठिकाणीं लहान लहान राज्यें स्थापन केलीं. हें पाहिल्यानंतर अतिशय धूर्त असे इंग्रज लोक स्वस्थ कसे बसतील ? पोर्तुगीज व फ्रेंच ह्या दोघांपेक्षांही इंग्रजांची कर्तबगारी अचूक असल्यामुळें प्रदेशच्या प्रदेश व राज्येंच्या राज्यें त्यांच्या घशांत जाऊं लागलीं ! त्यांत इंग्रजांच्या मायावीपणाची शहामत ही कीं जें कांहीं चाललें आहे तें सर्व आपल्या बऱ्यासाठींच चाललें आहे अशी ' प्रामाणिक ' कल्पना हळूहळू हिंदी नागरिकांची होऊं शकली. ब्रिटिशांनीं आक्रमणांत इतकें यश मिळवलें कीं १८१८ सालीं पुण्याच्या शनिवारवाड्यावरील भगवा झेंडा उखडला गेला आणि पंजाबखेरीज सर्व हिंदुस्थानांत इंग्रजांचें निशाण - यूनिअन जॅक - तोऱ्यानें फडकूं लागलें !!!

इंग्रज हे अतिशय धोरणी, दूरदर्शी व पाताळयंत्री असल्यामुळें त्यांनीं सर्व हिंदवासीयांच्या हातांतील शस्त्रें काढून घेऊन त्यांना निःशस्त्र केलें. ' तुमच्या संरक्षणासाठीं आमची तरवार सदैव सिद्ध असतांना तुम्हांला ही अडगळ हवी कशाला ? ' हा इंग्रजांचा सवाल त्या वेळच्या पुष्कळशा हिंदवासीयांना इतका योग्य वाटला कीं त्यांनीं आपलीं शस्त्रें स्वखुषीनें इंग्रजांच्या शस्त्रागारांत दाखल केलीं !



हिंदवासीयांनीं आपलीं शस्त्रें स्वखुषीनें इंग्रजांच्या शस्त्रागारांत दाखल केलीं.

मुसलमान बादशाहांच्या अमदानींत लहान लहान कां होत ना, पण अनेक हिंदु राज्यें अस्तित्वांत होतीं आणि त्याहूनही विशेष म्हणजे कोणालाही हातीं शस्त्र घेण्यास मनाई नव्हती. तलवारीच्या जोरावर अन्याय करावयास सरसावणाऱ्या मुसलमानाला तलवारीनें जबाब देऊं इच्छिणाऱ्या हिंदूला तसें करण्याची पूर्ण सवलत होती. इंग्रजांचा अंमल सुरू झाल्यानंतर मात्र हिंदूच काय पण मुसलमानही गुलाम बनले आणि निःशस्त्रही झाले.

देशाला पूर्णपणें निःशस्त्र केल्यानंतर देशाचें गतस्वातंत्र्य पुन्हा परत मिळविण्याची नुसती कल्पनाही कोणाच्या मेंदूला शिवणार नाहीं हा इंग्रजांचा कयास मात्र साफ चुकला. स्वतःला इंग्रजांचे गुलाम समजून घेण्याचें लांछन ज्यांच्या कपाळीं लागलें होतें तीं सर्वच माणसें सारखीं नव्हतीं. त्यांत जसे गाईबैल होते, तसेच सिंहही होते. पण सिंहालासुद्धा अनुकूल संधीची वाट पाहात स्वस्थ बसावें लागतें. तशीच स्थिति कांहीं कालपर्यंत स्वातंत्र्यभक्तांची झालेली होती हें मात्र खरें.

असे स्वातंत्र्यभक्त त्या काळांतही नसते व स्वातंत्र्यवृत्तीचें बीजच उखडलें गेलें ही इंग्रजांची कल्पना खरी असती तर इंग्रजी सत्तेविरुद्ध आपला हात उचलण्यास हिंदवासीयांपैकीं कोणीही मायेचा पूत धजला नसता. पण स्वातंत्र्याचीं बीजें मूळ धरून होतीं व संधि मिळतांच तीं



हिंदी स्वातंत्र्यभक्तांच्या असंतोषाच्या ज्वालामुखीचा स्फोट झाला.

फोफावणार होती, ह्याचा प्रत्यक्ष प्रत्यय चाळीस वर्षांतच इंग्रजांना आला. ता. १० मे १८५७ रोजीं पारतंत्र्यास विटलेल्या हिंदी स्वातंत्र्यभक्तांच्या असंतोषाच्या ज्वालामुखीचा स्फोट झाला आणि हां हां म्हणतां त्याच्या भयानक ज्वाला हिंदुस्थानभर भडकत गेल्या. त्या वेळीं, तत्पूर्वी व त्यानंतर (म्हणजे १९४७ सालीं भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत) निरनिराळ्या स्वातंत्र्यभक्तांनीं केवळ देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या हेतूनें जे वैयक्तिक व सामुदायिक प्रयत्न केले त्यांचा इतिहास विद्यार्थ्यांना व एकंदर तरुण पिढीला स्फूर्तिदायक होईल ह्यांत शंका नाहीं.



# मूर्तिमंत संग्राम



भारतांत लूटमार करण्यासाठीं आलेले मुसलमान क्रमाक्रमानें राज्यकर्ते होऊन बसले. त्या मुदतींत हिंदु राज्यें अजीबात लयाला गेलेलीं नव्हतीं हें ह्यापूर्वींच सांगितलेलें आहे. ज्यांचीं राज्यें मुसलमानांनीं आपल्या घशांत घातलीं त्यांच्यापैकीं कांहीं अपवाद सोडून कोणाच्याही मनास राज्य परत मिळवण्यासाठीं लढण्याची कल्पना शिवेना. अपवादांमध्यें राजस्तानची वीरप्रसवा भू होती. आपलें गेलेलें स्वातंत्र्य परत मिळवण्यासाठीं राजस्तानांतील अनेक स्वातंत्र्यभक्तांनीं प्राणपणानें लढे केले आणि स्वातंत्र्याची ज्योत जिवंत ठेवली. विशेषत: मेवाडची भूमि मुसलमान आक्रमकांच्या रक्तानें अक्षरश: न्हाऊन निघाली होती.

गमावलेलें स्वातंत्र्य परत मिळवण्यासाठीं लढा देणारा पहिला स्वातंत्र्यवीर राणा संग्रामसिंह हा होता. त्याचें मूळचें नांव संग. तो मेवाडचा राणा रायमल्ल ह्याचा मुलगा. त्याला पृथ्वीराज व जयमल्ल असे दोन भाऊ होते. ह्या तिघा भावांत तंटे बखेडे माजले व संगाचा एक डोळा निकामी होऊन त्याला मेवाडांतून निघून जावें लागलें. त्यानें अनेक



पृथ्वीराज

वर्षें अज्ञातवासांत काढलीं. ह्या काळांत शेळ्या राखण्यापासून भाकरी बडवण्यापर्यंत अनेक हलकीं कामें त्याला करावीं लागलीं. पुढें त्याला श्रीनगरच्या राव करमचंदाच्या लष्करांत नोकरी मिळाली. त्याच्या शौर्यादि गुणांवर लुब्ध होऊन राव करमचंदानें आपल्या मुलीचें त्याच्याशीं लग्न लावून दिलें. नंतर तो मेवाडच्या राजधानींत, म्हणजे चितोडगडीं आला. तत्पूर्वी पृथ्वीराज आणि जयमल्ल मरून गेले होते आणि राणा रायमल्ल आपल्या गादीचें काय होणार ह्या चिंतेंत होता. संगाला परत आलेला पाहून त्याची काळजी दूर झाली. कालांतरानें रायमल्ल निधन पावला आणि संग त्याच्या गादीवर बसला. तेव्हांपासून त्याला राणा संग्रामसिंह हें नांव पडलें.

ह्या वेळपर्यंत दिल्ली, माळवा, गुजराथ, सिंध, पंजाब, इत्यादि प्रांत मुसलमानांच्या हातीं गेले असल्यामुळें मेवाडची भूमि अक्षरशः आक्रमकांच्या कैचींत सापडल्यासारखी झाली होती. मेवाड घशांत घालण्यासाठीं ते डोळ्यांत तेल घालून बसलेले होते. संग्रामसिंहाला ह्याची पूर्ण कल्पना होती आणि आक्रमकांचा हा डाव साधूं नये म्हणून त्यानें शक्य तेवढी दक्षता बाळगली होती. प्रथमतः आपल्या राज्याची त्यानें नीट व्यवस्था केली. प्रसंग आला तर मेवाडचा प्रत्येक पुरुष मेवाडच्या स्वातंत्र्यासाठीं प्राण पणास लावून लढेल अशी त्याची खात्री झाल्यावर हिंदु राजांचें संघटन घडवून आणण्याचें काम त्यानें हातीं घेतलें. ह्या कामींही त्याला थोडें फार यश मिळालें.

दिल्लीच्या तख्तावर त्या वेळीं आरूढ झालेल्या इब्राहिम लोदीबद्दल त्याच्या प्रजेंत आपुलकीची भावना नव्हती. त्यामुळें त्याच्या राज्यांत थोडी फार


बाबर

बजबजपुरीच होती. आपली जरा ढिलाई झाली कीं कोणता ना कोणतातरी मुसलमान सरदार आपल्यावर चालून येणारच ही संग्रामसिंहाची खात्री असल्यामुळें, त्यांपैकीं कोणाला अशी संधि मिळण्यापूर्वी त्यांच्या एखाद्या नाजूक जागीं आपणच पहिला प्रहार करावा असें त्यानें आपल्या मनाशीं ठरवलें व इब्राहिम लोदीच्या प्रजेंतील असंतोष पाहून दिल्लीवर स्वारी करण्याचें योजिलें.

कशी न कळे, ही वार्ता इब्राहिम लोदीला समजली आणि तोच आपलें सैन्य घेऊन चितोडच्या रोखानें निघाला. संग्रामसिंहही त्या वेळीं आपल्या सैन्यासह दिल्लीच्या वाटेनें निघाला होता. खोतोलीजवळ ह्या दोन्ही सैन्याची गांठ पडली आणि घनचक्कर युद्ध जुंपलें. इब्राहिम लोदीला युद्धांतून जिवानिशीं पळ काढावा लागला. इब्राहिमचा मुलगा संग्रामसिंहाच्या हातीं लागला. त्याच्याकडून खंडणी घेऊन संग्रामसिंहानें त्याला उदारपणानें जीवदान दिलें.

पराभवाचें शल्य इब्राहिम लोदीच्या मानी मनाला रात्रंदिवस सलत होतें. पूर्वीच्या पराभवाचा सूड घेण्याचा त्यानें चंग बांधला. त्यानें अव्वल दर्जाची फौज जमविली व चितोडवर धडक मारली. संग्रामसिंहाच्या देशाभिमानी रजपुतांनीं थोड्याच अवधींत त्याच्या अफाट फौजेची दाणादाण उडविली आणि इब्राहिम लोदीला आपला जीव घेऊन पळतां भुई थोडी झाली. ह्या युद्धांत मुसलमानांना रजपुतांची अशी कांहीं दहशत बसली कीं पुढें कांहीं वर्षेंपर्यंत रजपुतांशीं लढाई करण्याचें नुसतें नांव निघालें तरी भीतीनें त्यांचा थरकांप उडे !

इब्राहिम लोदीचा हा दुसरा पराभव झाल्यानंतर कांहीं काळानें बाबरानें त्याला दिल्लीच्या तख्तावरून हुसकावून लावलें आणि तो स्वतः दिल्लीपति

बनला. असें करतांना बाबराला अनेकांचें शत्रुत्व ओढवून घ्यावें लागलें असलें तरी त्याला खरी भीति वाटत होती ती मेवाडच्या संग्रामसिंहाची. संग्रामसिंहाच्या व त्याच्या मातृभक्त रजपुतांच्या शौर्यापुढें आपला निभाव लागणें कठीण हें बाबर पुरतेपणीं ओळखून होता. म्हणून त्यानें त्याला वश करण्याची एक निराळीच कृति काढली. मित्रत्वाच्या नात्यानें त्यानें आपला हात संग्रामसिंहापुढें केला. हिंदुस्थानांत मुसलमान हे आक्रमक असून साऱ्या हिंदुस्थानाला आपला गुलाम बनविण्याची त्यांची राक्षसी महत्त्वाकांक्षा आहे हें संग्रामसिंह जाणून असल्यामुळें बाबराच्या नाटकी आविर्भावानें तो फसला नाहीं आणि मोठें सैन्य घेऊन उत्तरेकडे चाल करून निघाला. बाबरही चतुर व पराक्रमी होता. मुसलमान सरदारांचें संघटन घडवून आणण्याच्या कामीं त्यानें यश मिळविलें होतें आणि आपलें कवायती सैन्य अष्टौप्रहर जय्यत ठेवण्याची दक्षता त्यानें बाळगली होती. लांब पल्ल्याच्या तोफांचा संग्रह करण्यासही तो विसरला नव्हता.

राणा संग्राम आपल्यावर चाल करून येत असल्याची बातमी समजतांच बाबरानें आपलें सैन्य घेऊन शिक्रीला मुक्काम ठोकला. शिक्रीजवळ खानवा येथें दोन्ही सैन्यें एकमेकांना भिडलीं. रजपूत सैन्य इतक्या निकरानें लढलें कीं बाबराची सेना भयभीत होऊन पळत सुटली. अपार लूट व रणसाहित्य संग्रामसिंहाच्या हातीं आलें. पहिल्या फेरींत संग्रामसिंहानें बाबरावर मात केली.

बाबर अतिशय मानी आणि मोठा हुन्नरी होता. झालेल्या पराभवानें त्याच्या अंगाचा भडका उडाला होता. पण रजपुतांच्या शौर्यानें आपलें मुसलमान सैन्य दिपून गेलें असल्यानें त्याच्यांत आत्मविश्वास निर्माण करून त्याला पुन्हा युद्धासाठीं तयार करण्याचें कर्म महाकठीण होऊन बसलें असल्याची त्याला जाणीव होती. आतां धर्माचें नांव घेऊन, अल्लाचा आदेश म्हणून "रजपूत काफिरांना धूळ चारायला माझ्याबरोबर चला"

८५११५८ २८।११।५३

असें सांगितलें तरच सर्व मुसलमान शिपाई धैर्यानें लढतील हें त्यानें जाणलें. बाबराचा हा बाण सैनिकांच्या वर्मी लागला आणि त्यांच्यांतील वीरश्री जागी होऊन ' मारूं किंवा मरूं ' अशा निर्धारानें ते उठले.

बाबराच्या व संग्रामसिंहाच्या सैन्यांच्या तलवारींचा खणखणाट सुरू झाला. समरांगणावर दोन्ही बाजूच्या सैनिकांच्या प्रेतांचे ढीग पडले. युद्धाच्या धुमश्चक्रींत राणा संग्रामसिंह घायाळ झाला तेव्हां त्याच्या कांहीं सैनिकांनीं त्याला उचलून जंगलांत पळविलें. उरलेल्या सैनिकांचें धैर्य गळाल्यामुळें त्यांची पळापळ सुरू झाली व अशा रीतीनें बाबर विजयी झाला.

कांहीं वेळानें शुद्धीवर आल्यावर आपला पराभव झाल्याचें वर्तमान संग्रामसिंहाला समजलें तेव्हां रणांगणावरून आपल्याला पळवून आणल्या-बद्दल आपल्या सैनिकांची त्यानें खडसून हजेरी घेतली. रणांगणांतून पळ काढून नामुष्कीचें जिणें जगण्यापेक्षां लढत असतांना शत्रूच्या तलवारीनें मरण येणें सहस्रपटींनीं श्रेयस्कर अशी त्याची भावना होती.


सैन्याची पुन्हा जमवाजमव करून संग्रामसिंहानें त्यांच्यांत चेव निर्माण केला आणि बाबराचा पुरा मोड करण्याचा चंग बांधला. एका निमकहरामानें त्याच्यावर विषप्रयोग करून त्याचा शेवट केला नसता तर पुन्हा बाबराशीं दोन हात करून स्वातंत्र्याचा लढा संग्रामसिंह यशस्वीपणें लढला असता असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं.



आपल्या सैनिकांची त्यानें खडसून हजेरी घेतली.



# हळदीघाट



बाबराचा नातू अकबर हा अत्यंत पराक्रमी व धोरणी मोगल बादशाहा सन १५५६ त दिल्लीच्या तख्तावर बसला. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत मुसलमानांचा अर्धचंद्रांकित ध्वज फडकवण्याची त्याची महत्त्वाकांक्षा होती. त्याच्या पूर्वी जे मुसलमान राजे होऊन गेले त्यांना लागलेल्या ठेचांनीं तो शहाणा झाला होता. जागोजागीं शत्रु निर्माण करून त्यांच्याशीं सामना देत ही महत्त्वाकांक्षा पुरी करणें अशक्य आहे हें तो जाणून होता. म्हणून त्यानें अगदीं निराळेंच धोरण आंखलें. मुसलमानी धर्माइतकाच हिंदु धर्माबद्दलही आपल्याला आदर आहे असें दाखविण्याची शिस्तवार शिकस्त त्यानें केली. तो कधीं कधीं हिंदूंच्यासारखा पोषाख करीत असे. तो जानवें घाली अशीसुद्धा वदंता आहे. ह्या साखरपेरणीचा इष्ट तो परिणामही झाला. कांहीं मुसलमान राजे व सरदार सुंदर व तरुण हिंदु मुलींना आपल्या जनानखान्यांत खेचून नेऊन डांबीत असत आणि हिंदूंचा रोष आपणावर ओढवून घेत. अकबरानें असला जुलूम कधीं केला नाहीं. ज्या रजपूत राजकन्या त्याला हव्या असत त्यांच्यासाठीं तो

राजरोस मागणी घाली. आपल्या कन्येला वा भगिनीला दिल्लीपतीची राणी होण्याचा मान मिळण्याच्या भाग्याला भाळून कांहीं रजपूत राजे आपल्या कन्या वा भगिनी अकबराला राजीखुषीनें अर्पण करीत. अनेक रजपूत राजांना त्यानें दरबारांत मोठमोठ्या मानाच्या जागा दिल्या आणि कित्येकांवर जहागिरी आणि इनामें ह्यांचा वर्षाव केला. बऱ्याचशा स्वातंत्र्यप्रेमी रजपूत राजांना त्यानें वश करून घेतलें. जर एखादा स्वातंत्र्यभक्त वश न होतां स्वातंत्र्यासाठीं डोकें वर काढूं लागला तर हे मिंधे रजपूत परस्पर त्याला ठेचून टाकतील असा विश्वास त्याच्या मनांत उत्पन्न झाला.



अकबर

मेवाडच्या गादीवर राणा प्रतापसिंह बसला त्या वेळची एकंदर परिस्थिति अशी होती. ज्या रजपुतांनीं आपल्या आयाबहिणींना अकबराच्या झनानखान्यांत घातलें त्यांची प्रतापसिंह निर्भर्त्सना करी. अकबर व्यक्तिशः चांगला असेल कदाचित् पण जोंपर्यंत तो भरतभूमीला गुलामगिरींत खितपत ठेवीत आहे तोंपर्यंत त्याच्या वैयक्तिक चांगुलपणाचें कौतुक करावयास त्याचें मन कबूल होईना आणि त्याला फुरसदही नव्हती. ‘ माझ्या देशाच्या मानेभोवतीं फास टाकणारी व्यक्ति कितीही सौजन्यपूर्ण असली तरी त्या व्यक्तीला मी माझा कट्टा दुष्मनच मानणार ’ अशी त्याची वीरवृत्ति होती.



प्रतापसिंह

प्रतापसिंह मेवाडचा राणा झाला खरा पण मेवाडची राजधानी चितोड मुसलमानांच्या ताब्यांत होती. चितोडच्या मुक्ततेचा त्याला रात्रंदिवस ध्यास



६०५९

लागला. चितोड स्वतंत्र करणें हें एकच त्याचें ध्येय होतें. चितोडवर फडकणारें हिरवें निशाण उखडून निघेपर्यंत आपण ताटांत जेवणार नाहीं आणि गादीवर झोपणार नाहीं अशी त्यानें प्रतिज्ञा केली. तो पानावर जेवी व गवतावर झोपे.

अकबर अतिशय चतुर होता. प्रतापसिंहानें केलेली प्रतिज्ञा त्याच्या कानांवर गेली तेव्हां तो सचिंत झाला आणि ह्या सिंहाला चुचकारण्याच्या हेतूनें त्याच्या बारीक सारीक हालचालींवर कसून लक्ष ठेवूं लागला.

अकबराची मर्जी संपादन करून ऐषआरामांत मशगूल झालेले रजपूत राजे म्हणजे श्वासोच्छ्वास करणारीं मढीं होत हें प्रतापसिंह ओळखून होता. तरीही त्यांना आपल्या पवित्र कार्यांत मदत करण्यासाठीं त्यानें आदरानें पाचारण केलें. तो स्वतः सैन्याची जमवाजमव करूं लागला. सैन्यामागें खजिन्याचा पाठिंबा पाहिजे पण प्रतापसिंहाचा खजिना जवळ जवळ रिता झालेला असल्यामुळें चितोडवर स्वारी करण्यास लागणारें सैन्य उभारण्याच्या मार्गांत अडचण येऊं लागली. पण त्याला स्वस्थ बसवेना. पुरेसें सैन्य मिळेपर्यंत वाट पाहावयाची तर किती कालावधि लागेल ह्याचा नेम नव्हता. म्हणून असलेल्या सैन्याच्या जोरावरच चितोडवर हल्ला करण्याचा त्यानें हिय्या केला. ह्या स्वारीच्या वेळीं प्रतापसिंहाजवळ पुरेसें सैन्य नव्हतें आणि त्याला प्रत्यक्ष लढण्याचा फारसा अनुभवही नव्हता. परिणाम व्हावयाचा तोच झाला. प्रतापसिंहास माघार घ्यावी लागली पण पराभवानें तो खचला नाहीं. उलट आपलें सामर्थ्य वाढवून, ह्या पराभवाचा पुरेपूर सूड घेण्याचा त्यानें निश्चय केला.

अकबरानें मैत्रीचा हात प्रतापसिंहापुढें केला आणि त्यानें मैत्री केल्यास त्याचें चितोडही त्याला देऊन टाकूं असें आमिष दाखविलें. पण प्रतापसिंहाची जात सिंहाची होती. त्याला चितोड पाहिजे होतें तें अकबराची देणगी म्हणून नको होतें, तर मनगटाच्या जोरावर संपादन

२८२०



मानसिंग

केलेलें मानचिन्ह म्हणून हवें होतें. प्रतापसिंहाच्या तेजस्वी वृत्तीचा प्रत्यय आल्यानंतरही गोडीगुलाबीनें त्याला वश करण्याची महत्त्वाकांक्षा अकबरानें सोडली नाहीं. अकबराच्या पदरीं मानसिंग नांवाचा एक मोठा सरदार होता. अनेक रजपूत राजांप्रमाणें ह्यानेंही अकबराशीं सोयरीक घडवून सरदारकी मिळविली होती. हा मानसिंग प्रतापसिंहाचा बालमित्र होता. त्याच्या मार्फत प्रतापसिंहाशीं मैत्री जोडणें शक्य होईल अशा कल्पनेनें अकबरानें त्याला प्रतापसिंहाकडे पाठविलें.

मानसिंगानें अकबराशीं सोयरीक घडवली म्हणजेच त्याची गुलामगिरी पत्करली ह्याची प्रतापाला चीड आली होती. पण तो आपल्या घरीं आल्यावर त्याची योग्य ती विचारपूस करणें हें त्याला आपलें कर्तव्य वाटत होतें. अकबराशीं मैत्री संपादन केल्यानें प्रतापाला केवढें वैभव प्राप्त होईल ह्यासंबंधींचीं रसभरित वर्णनें मानसिंगानें सुरू केलीं तेव्हां मात्र प्रतापाच्या रागाचा पारा चढूं लागला आणि भोजनाच्या वेळीं मानसिंगाला आपल्या पंक्तीला घेण्याचें त्यानें साफ नाकारलें. हा आपला अपमान आहे असें मानसिंग म्हणूं लागतांच प्रतापानें त्याची चांगली हजेरी घेतली. प्रताप म्हणाला, " अकबराच्या वैभवाला भाळून आणि त्यानें दाखविलेल्या लाघवाला हुरळून आपल्या बायकामुली आपल्या हातानें त्याच्या जनानखान्यांत नेऊन पोचवितांना आणि आपल्या देशाच्या मानेभोवतालचे गुलामगिरीचे पाश अधिक घट्ट आवळतांना तुझ्यासारख्या रजपुतांच्या मनाला मानापमानाची जाणीव होत नाहीं किंवा तिळमात्रही शरम वाटत नाहीं आणि माझ्यासारख्या सच्च्या मित्रानें तुमच्या स्वाभिमानाला जाणून बुजून डिवचून तुमच्यांतलें तेज जागृत करण्याचा प्रयत्न केला तर त्यांत तुम्हांला अपमान वाटतो !

आतां मी तुला स्पष्टच सांगतों, माझ्या देशाला गुलाम करणाऱ्या अकबरा-इतकेच त्याच्या हाताला हात लावून त्याच्या ह्या पापकर्मांत त्याला साथ करणारे तुझ्यासारखे निमकहरामही मला माझे कट्टे दुष्मनच वाटतात. अकबरासारख्या परकी राज्यकर्त्याशीं तूं नामुष्कीची हातमिळवणी केली नव्हतीस तोंपर्यंत तुला मी माझा मित्र मानीत होतों. पण ज्या क्षणीं तूं अकबराच्या पायाची धूळ चाटूं लागलास त्याच क्षणीं आपलें मैत्रीचें नातें खलास झालें. अकबराची गुलामगिरी सोडून आपल्या मातृभूमीला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीं तूं आपला हात माझ्या पुढें करशील तर तो हात आनंदानें आणि अभिमानानें आपल्या हातांत धरायला मी कोणत्याही क्षणीं तयार आहें. पण तूं तसें केलें नाहींस तोंपर्यंत अकबराइतकाच तूंही माझा कट्टा शत्रुच राहाणार ! ”

प्रतापाचे हे वाग्बाण मानसिंगाच्या वर्मीं झोंबले व तो तसाच दिल्लीला निघून गेला. प्रतापसिंहानें आपल्या सत्तेविरुद्ध राजरोस बंड उभारलें असल्याची वार्ता ऐकून अकबर रागानें लाल झाला. मानसिंगाच्या झालेल्या अपमानाबद्दल त्याची समजूत घालून अकबर म्हणाला, “ तुम्ही प्रताप-सिंहाकडे माझे वकील म्हणून गेलां होतां. तेव्हां हा अपमान तुमचा नसून माझाच आहे असें मी समजतों आणि त्याचा सूड लवकरच घेतल्याशिवाय मी राहाणार नाहीं. ”

अकबरानें मानसिंगाच्या हाताखालीं खूप मोठें सैन्य देऊन शिवाय आपला मुलगा सेलीम ह्यालाही त्याच्याबरोबर पाठविलें. ह्याप्रमाणें जय्यत तयारीनिशीं मानसिंग आपल्या अपमानाचा बदला घ्यावयास निघाला.

ह्या वेळीं प्रताप कुमळनेर येथें होता. मानसिंग आपल्यावर चालून येत आहे हें समजतांच त्यानेंही आपल्या सैन्याची जमवाजमव सुरू केली. मानसिंग कुमळनेरला येऊन थडकेपर्यंत प्रतापसिंहाच्या बाजूला बावीस हजार सैन्य तयार झालें होतें. शिवाय डोंगरांतील भिल्ल टोळ्यांचीही त्याला



सेलीम ( जहांगिर )

मदत होतीच. मानसिंगाला मदत करण्यासाठीं अकबराचा मुलगा सेलीमही रणांगणावर येऊन दाखल झाला आहे हें समजतांच प्रतापसिंहाला अधिकच हुरूप आला.

दोन्ही सैन्यांची हळदीघाटांत गांठ पडली. रजपूत सैन्यानें मोगल सेनेची अक्षरशः लांडगेतोड केली. खुद्द मानसिंगाशीं मुकाबला करण्याची प्रतापसिंहास तळमळ लागून राहिलेली असल्यामुळें आपल्या आवडत्या चेतक नांवाच्या घोड्यावर स्वार होऊन तो रणांगणावर विजेसारखी हालचाल करीत होता. पण मानसिंग त्याच्या समोर येईनाच. त्याला गांठण्याचा प्रतापानें तर निश्चयच केला होता. हा आपला निश्चय तडीस नेण्याच्या हेतूनें तो बेदरकारपणें मोगलांच्या सेनेंत शिरला. मोगल सेनेची त्यानें दाणादाण उडविली. पुढें पुढें जात असतांना थोड्याच वेळांत हत्तीवर अंबारींत बसलेला सेलीम त्याला दिसला. सेलीमला पाहून त्याचा त्वेष अनावर झाला आणि चेतकाला टाच मारून त्यानें इशारा दिला. डोळयाचें पातें लवतें न लवतें तोंच चेतक त्या हत्तीशीं जाऊन भिडला आणि आपले पुढचे दोन पाय त्यानें त्याच्या गंडस्थळावर ठेवले. प्रतापानें पहिल्याच प्रहाराला माहुताला खालीं पाडलें आणि दुसरा वार सेलीमच्या रोखानें केला. पण सेलीमच्या आयुष्याची दोरी फार बळकट असल्यामुळें प्रतापाचा तो वार हुकला. एवढ्या धामधुमींत हत्ती बिथरला आणि रणांगणांतून पळत सुटला. अगदीं आपल्या हातांत सापडलेला सेलीम अशा रीतीनें सुटला ह्याचा प्रतापाला मनस्वी संताप आला. संतापातिरेकानें त्याला भान राहिलें नाहीं आणि निदान मानसिंगाला तरी गांठूं ह्या विचारानें तो मोगल सेनेंत घुसूं लागला. लवकरच त्याच्या बरोबरचें सैन्य मागें पडलें आणि तो एकटाच मोगल सैन्यांत वेढला गेला. अनेक लांडगे एकाच वेळीं आपल्या भक्ष्यावर तुटून पडावे तसे मोगल सैनिक प्रताप-



डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच चेतक हत्तीशीं जाऊन भिडला



सारी शक्ति पणास लावून त्यानें ओढ्यावरून उडी मारली.

सिंहावर तुटून पडले. मांडीखालीं त्याचा इमानी चेतक होता म्हणूनच तो जिवानिशीं बचावला. प्रताप व चेतक दोघेही जखमांच्या रक्तानें न्हाऊन निघाले होते. अशा स्थितींत आपले व आपल्या धन्याचे प्राण वांचविण्यासाठीं चेतक आपली शिकस्त करीत होता. चेतक प्रतापाला घेऊन विजेच्या वेगानें पळत असतांना पाठीशीं मोगल सैन्यांतील कांहीं लोक येऊन भिडले. समोर दुथडी भरून वाहाणारा ओढा आणि मागें ते लांडगे अशा कैचींत चेतक सापडला. तेव्हां आपली सारी उरलीसुरली शक्ति पणास लावून त्यानें त्या ओढ्यावरून उडी मारली. दैवानें हात दिला व दोघांचेही प्राण वांचले.

पण चेतकाच्या ताकदीलाही मर्यादा होतीच. आपल्या जखमांतून भळभळां रक्त वाहात असल्याच्या स्थितींत तो कित्येक मैल विजेच्या वेगानें दौड करीत होता. अखेर तो थकला आणि कोलमडून खालीं पडला. प्रतापानें चेतकाचें स्मरणचिन्ह म्हणून त्याच्या नांवानें एक चबुतरा बांधून त्याच्याविषयींची आपली कृतज्ञता व्यक्त केली.

आतां प्रतापाजवळ फारच थोडें सैन्य शिल्लक उरलें होतें. सैन्य वाढवायचें म्हटलें तर त्याला अवश्य असणारें द्रव्यबळ मिळण्याचा संभव नव्हता. अशाही स्थितींत स्वातंत्र्यलालसेनें त्याला सोडलें नाहीं. डोंगरांतील जंगली लोकांतच तो बायकामुलांसह राहूं लागला. थोडेंसें जुजबी सैन्यही त्याच्या मदतीला होतें. एवढ्या सामुग्रीच्या जोरावरच त्यानें अकबराशीं



९५९५८ २८-१-७-७१५-७३

लढत सुरू ठेवली. सेलीम अनेक वेळां प्रतापावर चालून आला पण प्रतापानें त्याला दाद दिली नाहीं.

अशा स्थितींत जसजसे दिवस जाऊं लागले तसतशी प्रतापसिंहाची हलाखी वाढूं लागली. द्रव्यबळ व मनुष्यबळ हीं दोन्हीही कमीकमी होत चाललीं. मोगल सैन्य मात्र प्रत्येक वेळीं अधिक मोठ्या संख्येनें व अवसानानें प्रतापावर चालून येत होतें. अशा स्थितींत त्याला बायका-मुलांना घेऊन भिल्लांच्या आश्रयानें राहावें लागत होतें. मुलांमाणसांना राहायला धड घर नाहीं, जेवायला पोटभर भाकरीसुद्धा नाहीं कीं पांघरायला लक्तरांशिवाय वस्त्र नाहीं, अशी स्थिति भोगण्याचा प्रतापावर प्रसंग आला. बायकामुलांची ही दैना होत असलेली पाहून प्रतापाचा जीव तिळतिळ तुटत असल्यास त्यांत नवल कसलें? पण ह्या परिस्थितींतही त्याला अभिमान वाटत होता. अकबराची थुंकी झेलून देशद्रोहाच्या मोबदल्यांत मिळणाऱ्या ऐषआरामापेक्षां देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या पायीं भोगाव्या लागणाऱ्या ह्या यातना त्याला अधिक सुखाच्या वाटत होत्या.

प्रतापाची ही परिस्थिति मेवाडचा पूर्वीचा कारभारी भामासा ह्याच्या कानीं गेली तेव्हां त्या स्वामिभक्तास मनस्वी दुःख झालें. त्यानें आपली सर्व जिंदगी प्रतापाच्या स्वाधीन केली. त्याच्या स्वामिभक्तीचा प्रतापानें गौरव केला. त्या द्रव्याच्या साहाय्यानें प्रतापसिंहानें सैनिकांची जमवाजमव केली आणि तो पुन्हा चितोड सर करण्याच्या उद्योगाला लागला.

शत्रूच्या ताब्यांत गेलेला एकेक किल्ला हस्तगत करण्याचा त्यानें सपाटा चालविला. प्रतापसिंहाच्या पराक्रमाची मोगलही तारीफ करूं लागले. मोगलांच्या ताब्यांत गेलेले बत्तीस किल्ले त्यानें परत मिळविले आणि जवळ-जवळ सर्व मेवाड त्यानें आपल्या ताब्यांत घेतला. पण दैवयोग विचित्र खरा. चितोड कांहीं त्याच्या हातीं आलें नाहीं!

प्रतापाच्या जिवाला चैन पडेना. त्याला ध्यानीं, मनीं, स्वप्नीं एकसारखें चितोड दिसत होतें. त्याला अन्नपाणी सुचेना कीं एक क्षणही झोप लागेना.

अनेक वर्षें आपत्तींशीं झगडतांना त्याची प्रकृति बिघडत होती, ती आतां अगदींच बिघडून गेली. प्रताप बिछान्याला खिळला !

तो आतां फार दिवस जगत नाहीं ही त्याच्या सगळ्या सग्यासोयऱ्यांची व इष्टमित्रांची खात्री होऊन चुकली. आजारी असतांना तो अहोरात्र तळमळत असे. शेवटीं शेवटीं त्याला इतकी अशक्तता आली कीं थोडेंसें बोलायचें म्हटलें तरी त्याला श्रम होत. आतां आपण ह्या आजारांतून बरे होत नाहीं, अशी त्याचीही खात्री होऊन चुकली. त्याच्या मनांतून कांहींतरी बोलायचें आहे, पण मोठ्यानें बोलण्याचें त्याच्या अंगांत त्राण नाहीं हें लक्षांत येऊन त्याच्या एका आवडत्या सरदारानें त्याच्या अगदीं जवळ जाऊन नम्रभावानें विचारलें, " राणाजी, आपल्या मनांत आम्हांला कांहीं सांगायचें आहे का ? असेल तर अवश्य सांगा. आपल्या आज्ञेचें पालन प्राण पणाला लावून करण्यांत आमच्या हातून कसूर होणार नाहीं. " ह्यावर त्या सरदाराचा हात आपल्या क्षीण हातांत घेऊन मोठ्या कष्टानें प्रतापसिंह म्हणाला, " माझी मातृभूमि स्वतंत्र करण्याची माझी इच्छा अपुरी राहिली ! ईश्वरेच्छा बलीयसी. चितोड ... चितोड ... चितोऽऽ ... "


राणा प्रतापाच्या तोंडून निघालेले हेच अखेरचे शब्द ! मरेपर्यंत तो स्वातंत्र्याचा लढा लढत राहिला. हिंदुस्थानचा इतिहास कोणी केव्हांही चाळला तरी राणा प्रतापसिंहाच्या नांवाशीं येऊन पोचल्यावर त्याची मान अत्यादरानें लवल्याशिवाय राहाणार नाहीं.



" मातृभूमि स्वतंत्र करण्याची माझी इच्छा अपुरी राहिली ! "



# सूर्योदय



श्री शिवाजीमहाराज सन १६२७ च्या वैशाख महिन्यांत जन्मले. तत्पूर्वी हिंदुस्थानची काय स्थिति होती? उत्तर हिंदुस्थानांत तर मुसलमानांचा एकछत्री अंमल होताच, पण दक्षिण हिंदुस्थानांतही मुसलमानांच्या तीन अतिबलाढ्य सत्ता नांदत होत्या. आपण ह्या देशाचे मालक असून आज चोर ठरलों आहोंत ह्याबद्दल हिंदूंच्या मनाला उद्वेगसुद्धा वाटत नव्हता. आपल्या देशाच्या गळ्याला गुलामगिरीचे तांत लावणाऱ्या मुसलमान राज्यकर्त्यांना आपले कट्टे दुश्मन मानणें तर दूरच पण त्यांची हांजी हांजी करून, त्यांच्यापुढें गोंडा घोळून, त्यांची थुंकी झेलण्यांत समाधान मानणारीं जिवंत मढींच जिकडे तिकडे पसरलेलीं दिसत होतीं. बालवय संपून थोडेंफार समजूं लागल्याबरोबरच शिवाजीस ही परिस्थिति असह्य होऊं लागली. घराचा मालक त्याच्याच घरांत कैदी ठरावा ह्या कल्पनेनें त्याच्या धमन्यांतील रक्त उसळूं लागलें. त्याला स्वराज्य स्थापण्याचा निदिध्यास लागला. सहस्रमुखांनीं सागराला मिळणाऱ्या भागीरथीप्रमाणें स्वातंत्र्यगंगेचा उगमही टीचभर लांबीरुंदीच्या क्षेत्रांत होत असतो हें त्यास पक्कें माहीत



शहाजी

असल्यामुळें शून्यांतून ब्रह्मांड निर्माण करण्याचा प्रयत्न करतांना तो विचकला नाहीं. डोईला मुंडासें आणि खालीं लंगोटी घालणाऱ्या साध्यासुध्या मावळ्यांना त्यानें हाताशीं धरलें आणि स्वराज्याचें रोपटें लावलें. स्वातंत्र्य ही चीजच अशी विलक्षण आहे कीं त्याची ज्योत एकदा पेटली म्हणजे तिच्या ज्वाळा भडकायला वेळ लागत नाहीं. स्वराज्यप्राप्तीच्या कामासाठीं महाराजांच्या जिवाला जीव देणारे सहकारी मी मी म्हणून पुढें सरसावूं लागले आणि त्यांच्या रक्तामांसाच्या खतानें स्वराज्याचें हें रोपटें असें फोफावलें कीं हां हां म्हणतां त्याचा प्रचंड वृक्ष बनला! त्याच्या वाढण्याचा वेग पाहून दिल्लीच्या तख्तावर बसलेल्या मुसलमान बादशहाच्या छातींतसुद्धा भीतीनें धडकी भरली!

शिवाजीचा बाप शहाजी हा प्रथम अहमदनगरच्या मुसलमान शहाकडे आणि नंतर विजापूरच्या शहाकडे नोकरीला होता. तो शूर, धोरणी व मर्यादित प्रमाणांत साहसी होता. स्वातंत्र्याचे विचार केव्हांतरी त्याच्या मनाला चाटून जात असत.

बलाढ्य मुसलमान बादशाह्या असतांनाही शहाजीनें दक्षिणेंत आपलें प्रस्थ चांगलें वाढविलें होतें. निजामशाहींत असतांना पुणें व सुपें हे प्रांत व शिवनेरी आणि चाकण हे किल्ले शहाजीला मिळाले होते. आदिलशहानें त्याला पुण्याजवळच्या मावळ सरहद्दीवर ताबा बसविण्यासाठीं रवाना केलें. कांहीं दिवसांनीं निजामशहानें पुनः शहाजीला आग्रहानें आपल्याकडे बोलावून घेतलें. सन १६३६ मध्यें मोगलांनीं निजामशाही खलास केली आणि शहाजी विजापूरकरांच्या नोकरींत गेला. आदिलशहानें त्याला कर्नाटकाच्या स्वारीवर पाठविलें त्या वेळीं त्यानें पुण्यांतील जहागिरीचा कारभार दादोजी कोंडदेव व आपली वडील पत्नी जिजाबाई ह्यांच्यावर



आदिलशाहा

सोपविला. जिजाबाईच्या पोटीं शिवनेरी किल्ल्यावर शिवाजीचा जन्म झाला होता.

शहाजी कर्नाटकांत गेल्यानंतर जिजाबाई शिवाजीसह पुण्यांत राहूं लागली. बालशिवाजीला स्वातंत्र्याची स्फूर्ति देणारी देवता जिजामाता हीच होती. बालपणीं शिवाजीस शिक्षण देण्याचें काम जिजाबाईनें दादोजी कोंडदेव ह्याच्यावर सोपविलें. दादोजी चतुर मुत्सद्दी व करडा कारभारी होता. राजपुत्राला योग्य असें सर्व प्रकारचें उत्कृष्ट शिक्षण त्यानें शिवाजीला दिलें. जिजाबाईच्या प्रेरणेमुळें स्वातंत्र्यासाठीं लढण्याचे विचार शिवाजीच्या मनांत घोळूं लागले व त्यासाठीं जरूर ती तयारी करण्याचा उद्योग त्यानें सुरू केला. लवकरच तानाजी मालुसरे, येसाजी कंक, बाजी पासलकर अशांसारखे तरुण त्याच्या भोवतीं जमा झाले. आपल्या जहागिरींतील सगळा मुलुख—डोंगर कपाऱ्यांसुद्धा—त्यानें आपल्या जोडीदारांसह आपल्या पायांखालीं घातला. दादोजीच्या मार्गदर्शनानें राज्यकारभारांतही त्यानें पारंगतता मिळवली.

पुणें व सुपें ह्या मूळच्या जहागिरींत बारामती, इंदापूर, मावळ ह्यांचा समावेश ह्यापूर्वींच झाला होता. कोंडाणा हें ह्या प्रदेशाचें नाकें असल्यामुळें तें हस्तगत केल्याशिवाय आपल्या स्वातंत्र्याच्या लढ्याला यशस्वी सुरुवात होणार नाहीं हें जाणून १६४४ मध्यें म्हणजे अगदीं बालवयांत शिवाजीनें कोंडाणा काबीज केला. स्वराज्यसूर्याचा उदय झाला.

कोंडाण्याच्या मागोमाग म्हणजे सन १६४६ मध्यें तोरणा किल्ल्याच्या किल्लेदाराशीं संधान बांधून शिवाजीनें तो किल्ला जिंकला. ह्या किल्ल्यांत फार मोठें द्रव्यभांडार मिळालें, त्यांतून शिवाजीनें राजगड बांधविला. नंतर थोड्याच दिवसांनीं त्यानें ....

प्रतिपच्चंद्ररेखेव वर्धिष्णुर्विश्ववन्दिता ।
शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ॥

ही आपली नवी मुद्रा प्रचलित केली. चाकणचा हवालदार फिरंगोजी नरसाळा ह्याला वश करून तो किल्ला आणि सन १६४८ मध्यें पुरंदर गड काबीज करण्यांत त्यास यश मिळालें. ह्यापुढें शिवाजीला 'शिवाजीमहाराज' असें लोक म्हणूं लागले. विजापूरकरांची नोकरी करणारे कांहीं पठाणही महाराजांच्या पराक्रमावर भाळले आणि त्यांच्यांतील पांचसातशें लोकांनीं महाराजांची नोकरी पत्करली.



शिवाजीमहाराज

१६५६ त महाराजांनीं रायगड जिंकला आणि मोऱ्यांचा निःपात करून सबंध जावळी प्रांत आपल्या ताब्यांत घेतला. पारघाटाचें नाकें आपल्या ताब्यांत राहाण्यासाठीं महाराजांनीं प्रतापगड बांधविला व त्या गडावर श्रीभवानी देवीची स्थापना केली.



श्रीभवानीदेवी

मोगलांचा दक्षिणचा सुभेदार, शहाजहान बादशहाचा मुलगा औरंगजेब, ह्याचें त्या वेळीं विजापूरकरांशीं युद्ध चालू होतें. ही संधि साधून महाराजांनीं जुन्नरवर हल्ला चढवला. मोगली मुलखांत धुमाकूळ घालीत मराठ्यांनीं अहमदनगर गांठलें; इतक्यांत मोगलांचा विजापूरकरांशीं तह झाल्यामुळें मराठे आपल्या मुलखांत परतले.



शहाजहान

कल्याणचा सुभेदार खजिना घेऊन विजापुरास जात असतांना महाराजांच्या हस्तकांनीं तो लुटून राजगडावर नेला. आबाजी सोनदेवानें कल्याण ताब्यांत घेतलें तर शामराज नीळकंठानें भिवंडी जिंकली.



औरंगजेब

उत्तर कोंकण ताब्यांत आल्यावर जंजिऱ्याच्या सिद्दीकडून महाराजांनीं तळें व घोसाळें हे दोन किल्ले घेतले व दक्षिण कोंकणांत मजल मारली. सावंतवाडीकर भोसले हे महाराजांचे मांडलीक बनले. पश्चिम समुद्र किनाऱ्यावरील सुवर्णदुर्ग व विजयदुर्ग हे किल्ले ताब्यांत आणून महाराजांनीं स्वराज्याची हद्द समुद्राला भिडविली.

महाराजांच्या ह्या विजयामुळें विजापूर दरबारचा संताप झाला आणि त्यांना जिवंत पकडून आणण्यासाठीं अफझुलखान नांवाच्या एका प्रचंड शरीराच्या सरदारास रवाना करण्यांत आलें. ही बातमी महाराजांस समजतांच खानाची हड्डी नरम करणें डोंगराळ भागांत अधिक सोपें हें जाणून ते ताबडतोब प्रतापगडावर येऊन राहिले. ही घटना १६५९ मध्यें घडली.

अफझुलखानाशीं शिवाजीनें दिलेला सामना म्हणजे त्याच्या अंगच्या विविध गुणांची रोमांचकारी गुंफण होय. बुद्धिकौशल्याच्या जोरावर शिवाजीनें हा सामना जिंकला. समोरासमोर लढाई दिल्यास यश अनिश्चित आणि मनुष्यबळाची हानि मात्र निश्चित. आपण शरण येण्यास तयार आहों, तहाच्या वाटाघाटी करण्यासाठीं प्रतापगडाच्या पायथ्याशीं राहुट्या ठोकाव्या, तेथें आम्ही येतों, असा निरोप शिवाजीनें पाठविला. अफझुलखानानें ही मसलत मान्य केली. तहाच्या वाटाघाटींच्या वेळीं तंबूमध्यें शिवाजी व त्याचे दोन शरीररक्षक आणि अफझुलखान व त्याचेही दोन शरीररक्षक एवढेच असावेत असा उभयपक्षीं करार झाला. अफझुलखान दगा करील अशी शिवाजीला शंका होती म्हणून त्यानें चिलखत चढवलें, शिरस्त्राणही



अफझुलखान



शिवाजीनें चटकन् वाघनखें खानाच्या पोटांत खुपसलीं.

घातलें, एका हातांत विचवा आणि दुसऱ्या हातांत वाघनखें अशा तयारीनेंच तो दोन रक्षकांसह तंबूंत येऊन पोचला. शिवाजीची शंका खरी ठरली. तंबूंत प्रवेश करतांच शिवाजीला खानानें आलिंगन देण्याच्या निमित्तानें चिरडून टाकण्याचा प्रयत्न केला. शिवाजीनें चटकन् वाघनखें खानाच्या पोटांत खुपसलीं आणि त्याचीं आंतडीं बाहेर काढलीं.

एका क्षणांत खान खलास झाला. त्याच्या फौजेंत गोंधळ उडाला. मावळे तुटून पडले तसे मुसलमान सैनिक पळून गेले. ९५ हत्ती, ४,००० उंट व घोडे, ७० तोफा आणि दहा लाख रुपयांहून अधिक द्रव्य, एवढें शिवाजीच्या हातीं आलें.

ह्यानंतर विजापूरकरांनीं शिद्दी जौहरला शिवाजीला नामोहरम करण्याकरितां पाठविलें. शिवाजीनें ह्या खेपेलाही बुद्धिबलाच्या जोरावरच लढा जिंकला. ह्या लढाईत सुप्रसिद्ध बाजी प्रभु कामास आला. ह्या बाजी प्रभूच्या पराक्रमावर रचलेला पोवाडा अतिशय प्रसिद्ध आहे.

अफझुलखानाचा मृत्यु आणि शिद्दी जौहरची फजिती ह्या दोहोंचा आदिलशाहीवर असा परिणाम झाला कीं विजापूरकरांनीं शिवाजीशीं समेट घडवून आणण्याचा मनसुबा सुरू केला. ह्या सुमारास म्हणजे सन १६६४ मध्यें शहाजी मृत्यु पावला. शिवाजीनें ‘राजा’ हें नांव धारण केलें आणि आपल्या शिक्क्याचीं नाणीं पाडलीं. विजापूरकरांचा व शिवाजीचा तह झाला.



शाहिस्तेखान



जयसिंग

आतां शिवाजीनें मोगलांकडे मोर्चा वळवला. ह्या वेळीं दिल्लीच्या तख्तावर शूर, क्रूर, धर्मवेडा, निर्व्यसनी आणि पाताळयंत्री औरंगजेब आरूढ झाला होता. शिवाजीनें इंग्रजांच्या व्यापाराचें ठाणें सुरत बंदर लुटलें आणि अफाट लूट मिळवून नेली. हाजला जाणाऱ्या मुसलमानांचें मुख्य बंदर सुरतच होतें. तेव्हां औरंगजेबाला शिवाजीच्या हालचालींकडे लक्ष देणें भाग पडलें. त्यानें प्रथम शाहिस्तेखानाला शिवाजीवर पाठविलें. खान महाराष्ट्रांतील मुलुख काबीज करीत पुणें शहरीं आला आणि तेथेंच त्यानें तळ ठोकला. एका रात्रीं शिवाजीनें त्याच्यावर छापा घातला आणि त्यानें राणीवशांत पळ काढला नसता तर तो प्राणासच मुकला असता. तरी त्याच्या उजव्या हाताचीं दोन बोटें छाटलीं गेलीं आणि त्याची नामुष्की झाली.

शाहिस्तेखानानंतर शूर रजपूत सेनानी जयसिंग व दिलेरखान ह्यांना औरंगजेबानें दक्षिणेंत पाठविलें. ह्यांच्या सैन्यबलापुढें आपला निभाव लागणार नाहीं हें पाहून शिवाजीनें त्यांच्याशीं तह केला. तेवीस किल्ले आणि चार लक्ष होन महसुलाचा प्रदेश शिवाजीला



एका रात्रीं शिवाजीनें त्याच्यावर छापा घातला.

मोगलांच्या स्वाधीन करण्याचें मान्य करावें लागलें. शिवाय शिवाजी व संभाजी हे दिल्लीला औरंगजेबास भेटावयास गेले.



दिलेरखान

दिल्लीस शिवाजीमहाराज गेले ते प्राणसंकटांतच पडले. बादशहा त्यांना योग्य मानानें वागवावयास तयार नव्हता. तेव्हां 'असला अपमान सहन करण्यासाठीं शिवाजीचा जन्म झालेला नाहीं.' असा खडा जबाब महाराजांनीं दिला. लगेच औरंगजेबानें त्यांना व संभाजीला पकडलें आणि आग्र्याच्या किल्ल्यांत डांबून ठेवलें. एवढ्या प्रयासानें मिळविलेलें आणि मुत्सद्देगिरीच्या शिताफीनें जतन केलेलें स्वातंत्र्य पुनः नाहींसें होतें कीं काय असें वाटूं लागलें.

आग्र्याहून सुटका ही तर शिवाजीमहाराजांच्या बुद्धिकौशल्याची परमावधि म्हटली तरी चालेल. औरंगजेबासारख्या तैलबुद्धि आणि सदा सावध बादशहाच्या कैदेंतून सुटून येणें हा फारच महनीय पराक्रम होता. तुरुंगाच्या बाहेर येऊन काम पुरें होणारें नव्हतें. शिवाजी पळून गेला हें ऐकतांच औरंगजेबानें चहूंकडे शिपाई रवाना केले. त्यामुळें त्यांना अनेक वेष घेत आणि आडवळणांनीं दक्षिण गांठावी लागली. अखेरीस ता. २० नोव्हेंबर १६६६ रोजीं शिवाजीमहाराज रायगडावर येऊन पोचले.

महाराष्ट्रांत आल्यावर मोगलांच्या स्वाधीन केलेले किल्ले परत काबीज करण्याचा शिवाजीनें सपाटा चालवला. ह्यांपैकीं कोंडाणा किल्ला सर करतांना नरवीर तानाजी मालुसरे कामास आला. 'गड आला पण सिंह गेला' हे उद्गार शिवाजीच्या तोंडून निघाले ते ह्याच वेळीं आणि ह्याच प्रसंगामुळें कोंडाणा किल्ल्याला 'सिंहगड' हें नांव पडलें.

त्या काळीं लोकांमध्यें प्रचलित असलेल्या समजुती लक्षांत घेऊन जिजाबाई व शिवाजी ह्यांनीं असें ठरवलें कीं केवळ स्वराज्य म्हणजे



संभाजी

स्वतंत्र राज्य स्थापून लोकांमध्यें स्थिर निष्ठा उत्पन्न होऊं शकत नाहीं. शिवाजी कितीही शूर असला, हुषार असला, कर्तबगार असला, तरी तो राजा नव्हता. तेव्हां शिवाजीला राज्याभिषेक झाला पाहिजे. स्वातंत्र्यासाठीं केलेल्या लढ्यांत मिळविलेल्या यशावर राज्याभिषेकाचा शिक्कामोर्तब अवश्य होता. म्हणून काशीच्या विद्वान् गागाभट्टांना त्यांनीं बोलावून आणलें. त्यांच्या हस्तें शक १५९६ ज्येष्ठ शु. १२ रोजीं शिवाजीला राज्याभिषेक झाला आणि ‘ स्वधर्मसंस्थापक गोब्राह्मणप्रतिपालक क्षत्रिय-कुलावतंस छत्रपति शिवाजीमहाराज ’ अशी त्यांच्या नांवाची ग्वाही फिरविण्यांत आली. ही घटना सन १६७४ मध्यें घडली. स्वातंत्र्याच्या लढ्यांत शिवाजीमहाराजांनीं मिळविलेलें यश सव्वाशें वर्षें अढळ राहिलें.

शिवछत्रपति सन १६८० मध्यें निधन पावले. त्यांच्या मागें त्यांचा मोठा मुलगा संभाजी गादीवर बसला. तो शूर होता पण उच्छृंखल होता. त्याच्या कारकीर्दींत औरंगजेब बादशाहा बारा लाख फौज घेऊन दक्षिण जिंकण्याकरितां आला आणि अहमदनगरच्या आसपास तळ देऊन राहिला. त्यानें विजापूर आणि गोवळकोंडा ह्या ठिकाणचीं मुसलमानी राज्यें खालसा केलीं आणि मराठी राज्यही खालसा करण्यासाठीं त्यानें शिकस्त केली. मोगलांशीं शौर्यानें लढत असतां फितुरीपायीं संभाजी औरंगजेबाच्या अटकेंत पडला. औरंगजेबानें त्याचा वध केला. संभाजीच्या मागाहून त्याचा सावत्र भाऊ राजाराम गादीवर बसला. राजारामाला महाराष्ट्रांत ठेवणें मराठे सरदारांना धोक्याचें वाटलें म्हणून त्याचा मुक्काम तंजावरांत जिंजी मुक्कामीं ठेवला आणि मराठा फौजेनें औरंगजेबाचा प्रतिकार चालू ठेवला. धनाजी जाधव व संताजी घोरपडे ह्या दोन सेनापतींनीं मोगल फौजेला हैराण करून सोडलें. मराठ्यांना जिंकण्याच्या कामीं औरंगजेबाला यश आलें नाहीं. तो दक्षिणेंतच अपेशाचे चटके खात सन १७०७ मध्यें मरण पावला.

त्याच्या पश्चात् मुसलमानी सत्ता खालावतच चालली. दिल्लीला बादशाहा राहिले पण ते दिवसेंदिवस नामधारी बनत चालले.



पहिला बाजीराव

राजाराम सन १७०० मध्यें वारला. त्याच्या पश्चात् त्याच्या पत्नीनें त्याच्या मुलास गादीवर बसवलें. सन १७०७ पर्यंत तो गादीवर होता. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर संभाजीचा मुलगा शाहू मोगलांच्या कैदेंतून सुटून आला आणि त्यानें आपली हक्काची गादी मिळविली. त्याच्याच कारकीर्दींत भट पेशवे पुढें आले आणि मराठी साम्राज्याची कल्पना मूर्तस्वरूपांत दिसूं लागली. विशेषेंकरून पहिल्या बाजीरावानें मराठा राज्याची इभ्रत कळसास पोचवली. हिंदुस्थानभर त्यानें मराठ्यांचा दरारा बसवला.

दिल्लीचा बादशाहा नामशेष झाला तरी एक वेळ ज्यांनीं सत्ता उपभोगली ते मुसलमान सरदार व नबाब गप्प बसले नाहींत. त्यांनीं अफगाणिस्तानच्या अमिराशीं संगनमत केलें आणि वाढत्या मराठी सत्तेला पायबंद घालण्याचा जोराचा प्रयत्न केला. मुसलमानांचा व मराठ्यांचा पानपत शहरीं घनघोर संग्राम झाला. मराठ्यांचा पराभव झाला आणि त्यांची एक कर्ती पिढी कामास आली.

मुसलमानांचा मात्र ह्या घटनेनें फारसा फायदा झाला नाहीं. हिंदुस्थानांतील हिंदु व मुसलमान लढले, दोघेही थकले. ह्यापासून फायदा झाला तो दूर देशांतून आलेल्या इंग्रजांचा होय. सतराव्या शतकांत इंग्रज लोक तराजू घेऊन हिंदुस्थानांत आले. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर निराळेच डाव टाकावयास त्यांनीं सुरुवात केली. पानपतच्या युद्धाच्या कालापर्यंत बंगाल व मद्रास ह्या दोन प्रांतांत त्यांनीं आपलें बस्तान चांगलेंच बसवलें. मुंबईकडे त्यांना प्रदेश बळकावतां आला नाहीं, पण नानासाहेब पेशव्याला



दुसरा बाजीराव

साह्य करण्याकरितां म्हणून इंग्रज पुढें झाले आणि मराठ्यांचें आरमार खलास करण्याची संधि त्यांना मिळाली. ह्या प्रकरणापासून इंग्रजांना मुख्य फायदा झाला तो मराठ्यांच्या दुहीबद्दल त्यांना नीट माहिती मिळाली हाच.

पानपतच्या लढाईनंतर इंग्रजांची हिंदुस्थानांत सारखी सरशी झाली. शिवाजीच्या मृत्यूनंतर एक शतक लोटलें त्या वेळीं मराठ्यांचाच एक पक्ष इंग्रजांच्या मदतीला आला आणि साष्टीबेट त्या पक्षानें इंग्रजांना आंदण दिलें. तेथपासून पुढला इतिहास स्वातंत्र्यप्रेमी हिंदूंची पिछेहाट कशी झाली हेंच सांगतो. सन १७९५ पर्यंत पुणें शहरांत इंग्रजांचा हात शिरला नव्हता. सन १७९६ सालीं दुसरा बाजीराव पेशवा झाला आणि त्यानें मराठ्यांचें राज्य गमावलें. सन १८१८ सालीं पुण्यांत शनवारवाड्यावरचें भगवें निशाण जाऊन इंग्रजांचा युनियन जॅक त्या ठिकाणीं फडकला. तत्पूर्वींच पंजाब व महाराष्ट्रखेरीज सर्व प्रदेश इंग्रजांनीं काबीज केलेला होता.



# चलो दिल्ली



स्वातंत्र्ययुद्ध आणि बंड ह्यांच्यामधील भेद म्हणजेच यश आणि अपयश ह्यांच्यामधील भेद. आपल्या देशाच्या मानेभोवतीं जखडलेला पाश तोडून टाकण्यासाठीं आपलें सर्वस्व देऊन पारतंत्र्याची होळी करावयास ज्या वेळीं स्वातंत्र्यभक्त प्रारंभ करतात त्या वेळीं राज्यकर्ते त्याला बंड आणि स्वातंत्र्यभक्तांना बंडखोर म्हणतात. तो स्वातंत्र्याचा लढा फसला म्हणजे इतिहासांतसुद्धा त्याला बंड असेंच नांव मिळतें. तो लढा यशस्वी झाला म्हणजे राज्यकर्त्यांनीं दिलेलें बंड हें नांव पुसलें जातें. इतिहास तर त्याला 'स्वातंत्र्य-युद्ध' म्हणतोच पण राज्यकर्तेसुद्धा कालच्या बंडखोरांना उद्यांचे राष्ट्रपुरुष म्हणून त्यांच्याशीं हातमिळवणी करावयास तयार होतात.

सन १८५७ च्या हिंदी स्वातंत्र्ययुद्धास 'बंड' हें नांव इंग्रजांनीं देऊन त्याची बदनामी केली ह्यांत आश्चर्यकारक असें कांहीं नाहीं. आश्चर्य हें कीं ज्या भारताची गुलामगिरी नष्ट करण्याकरितां तो स्वातंत्र्याचा लढा लढला गेला त्या भारतांतील कांहीं सुशिक्षित मूर्ख आणि लाळघोटे देशद्रोही त्या

लढ्याला बंड हें नांव देऊन इंग्रजांच्या हाताला हात लावावयास तयार झाले, किंबहुना, तसें करण्यांत त्यांनीं भूषण मानलें !

सन १८१८ सालीं पुण्याच्या शनिवारवाड्यावरील भगवें निशाण खालीं आलें आणि त्याच्या जागीं इंग्रज सरकारचा 'युनियन जॅक' तोऱ्यानें फडकूं लागला. त्या क्षणापासूनच हिंदी स्वातंत्र्यभक्तांच्या हृदयांत कालवाकालव सुरू झालेली होती. एक ना एक दिवस इंग्रजाचें तें मानहानिकारक निशाण तेथून हुसकून काढूं आणि त्या जागीं आपलें राष्ट्रीय निशाण फडकवूं अशी त्यांनीं आपापसांत प्रतिज्ञाही केली होती. अनुकूल संधि मिळेपर्यंत वाट पाहाण्याशिवाय त्यांना गत्यंतर नव्हतें.

ही संधि त्यांना १८५७ मध्यें मिळाली. त्या सालीं ता. १० मेला मीरत येथें स्वातंत्र्ययुद्धाची पहिली ठिगणी उडाली आणि मग सर्व उत्तर हिंदुस्थानभर ज्वाळांचा डोंब उसळला.

इंग्रजांच्या पदरीं असलेल्या लष्करी शिपायांना गाईची व डुकराची चरबी माखलेल्या काडतुसांचा उपयोग करावा लागे व त्यामुळें त्यांच्या धार्मिक भावनांवर आघात होई आणि त्यामुळें चिडून त्यांनीं इंग्रजांविरुद्ध उठावणी केली अशी ह्या स्वातंत्र्ययुद्धाची कांहीं वावदुकांकडून मीमांसा करण्यांत येते. ही मीमांसा अचूक असती तर नानासाहेब पेशवे, दिल्लीचे बादशहा, झांशीची राणी, रोहिलखंडाचा खान बहादुरखान, वगैरे मातबर मंडळी त्या स्वातंत्र्यसमरांत सामील झाली असती काय? हे सगळे इंग्रजांच्या लष्करांत नोकरीला होते का? शिवाय, इंग्रज गव्हर्नर-जनरलनें हिंदी लष्कराला आपल्या स्वतःच्या हातांनीं काडतुसें बनविण्याची मुभा दिल्यानंतरही शिपायांनीं लढाईचा मार्गच कां पत्करला?

सत्य हें कीं स्वधर्मसंरक्षण आणि स्वराज्यप्राप्ति ह्या दोन महान् तत्त्वांसाठींच हें समरकुंड पेटविलें गेलें आणि म्हणून शिपाईच काय, पण सहस्रावधि शांतताप्रिय नागरिक, राजे नि महाराजे कीं ज्यांचा सैन्याशीं

प्रत्यक्षाप्रत्यक्ष कांहींही संबंध नव्हता, ते सर्व आपापल्या प्राणांच्या आहुति देऊन स्वातंत्र्यरूपी अग्निनारायणाला संतुष्ट करण्याकरितां अहमहमिकेनें पुढें सरसावले !



लक्ष्मीबाईचे पति : नेवाळकर

१८५१ मध्यें दुसरा बाजीराव पेशवा निवर्तला. त्यापूर्वी त्यानें आपल्या मृत्युपत्रांत आपल्या दत्तक पुत्राला – नानासाहेबाला – वारशाचे व पेशवेपदाचे सर्व हक्क दिले होते. बाजीरावाला देण्यांत येत असलेलें आठ लाखांचें पेन्शन नानासाहेबांना चालू ठेवण्याचा इंग्रज सरकारनें इन्कार केला.

आज ज्याच्या त्याच्या तोंडीं जिचें नांव झालें आहे त्या झांशीच्या राणीनें १८५३ मध्यें आपल्या पतीच्या निधनानंतर दामोदर नांवाच्या मुलाला दत्तक घेतलें. इंग्रज सरकारनें ह्या दत्तविधानास आपली मान्यता दिली नाहीं व झांशी खालसा करण्यांत आलें असल्याचें जाहीर केलें. त्या प्रसंगीं ह्या झांशीच्या स्वातंत्र्यलक्ष्मीनें, “ तुमचा काय मगदूर असेल तो खर्च करून झांशीवर आक्रमण करून पाहाच – माझ्या देहांतील रक्ताचा अखेरचा थेंब शिल्लक असेपर्यंत मी झांशी लढविल्याशिवाय राहाणार नाहीं, ” असा इंग्रजांना खडखडीत जबाब दिला !



राणी लक्ष्मीबाई

ह्याच सुमाराला इंग्रजांच्या नोकरींत असलेल्या हिंदी लष्करालाही हें कळून आलें कीं गाईच्या किंवा डुकराच्या चरबीनें माखलेलीं काडतुसें आपल्याला दांतांनीं तोडायला लागोत वा न लागोत पण ह्या सर्व आपत्तीचें मूळ कारण असलेलें जें राजकीय दास्य त्याचा नाश केल्याशिवाय आपणाला स्वास्थ्य लाभणार नाहीं.


नानासाहेब

नानासाहेबांचा वकील अझीमुल्ला आपला यूरोपचा दौरा संपवून ब्रह्मावर्तास नानासाहेबांकडे परत आला आणि क्रांतिपक्षाचे सगळे प्रमुख वीर तेथें गोळा झाले. नानासाहेब आणि अझीमुल्ला ह्यांचें धोरण हें होतें कीं हिंदु-मुसलमानांनीं स्वदेशस्वातंत्र्याकरितां खांद्याला खांदा लावून लढावयाचें आणि स्वातंत्र्यप्राप्ती-नंतर हिंदी राजपुरुषांच्या नेतृत्वाखालीं हिंदुस्थानचें एक सुसंघटित असें संघराज्य बनवावयाचें. ह्या राजकीय ध्येयाची लोकांना दीक्षा देण्याकरितां १८५६ च्या सुमारास नानासाहेबांनीं सबंध हिंदुस्थानभर आपले प्रचारक पाठवून दिले होते.

स्वातंत्र्ययुद्धाच्या प्रचाराचें हें काम चालू असतांनाच दिल्लीच्या दिवाण-ई-खास मध्येंही क्रांतीचें बीज मूळ धरूं लागलें होतें. इंग्रजांनीं दिल्लीच्या बादशहाची बादशाही तर काढून घेतली होतीच पण ‘ बादशहा ’ ही त्याची पदवीही काढून घेण्याचें ठरविलें होतें. ह्याच सुमारास इंग्लंडचें इराणशीं युद्ध जुंपलें होतें. अशा वेळीं इंग्रजांविरुद्ध हिंदुस्थानच्या जनतेनें उठावणी केली तर ती आपल्याला फायदेशीर होईल अशा हेतूनें इराणच्या शहानें दिल्लीच्या बादशहाशीं गुप्त राजनैतिक वाटाघाटी चालू केल्या होत्या.

खालसा झालेल्या अयोध्येची राजधानी लखनौ येथें क्रांतीच्या ज्वाळा धुमसूं लागल्या होत्या. लखनौचा नबाब व त्याचा वजीर हे दोघे ह्या वेळीं कलकत्त्याजवळ राहात असत. हे दोघेही इंग्रजांच्या डोळ्यांत धूळ टाकण्याकरितां आपण नाचरंगांत दंग होऊन गेल्याचें नाटक करीत. पण खरें म्हणजे कलकत्त्याजवळ घडवावयाच्या कटाच्या रूपरेषा आंखण्यांत ते चूर झालेले असत.



दोघेही इंग्रजांच्या डोळ्यांत धूळ टाकण्याकरितां नाचरंगांत दंग होऊन गेल्याचें नाटक करीत.

स्वातंत्र्ययुद्धाची ही सारी सिद्धता इतक्या सावधगिरीनें करण्यांत येत होती-कीं युद्धाच्या खणाखणीला प्रत्यक्ष प्रारंभ होईपर्यंत धूर्तपणाची शेखी मिरविणाऱ्या इंग्रजांना तिचा जराही वास लागला नव्हता. निरनिराळ्या ठिकाणीं कार्य करणाऱ्या गुप्त संघटनांचे परस्पर संबंध प्रत्यहीं वाढत होते.

ता. १० मे १८५७ ह्या दिवशीं मीरतच्या हिंदी फौजेनें स्वातंत्र्य-युद्धाच्या सलामीची फैर झाडली. इंग्रजांच्या तोंडचें पाणी पळालें. भारताची राजधानी दिल्ली ही काबीज करून ह्या उठावणीला राष्ट्रीय स्वरूप प्राप्त करून द्यावयाचें असा क्रांतिकारकांचा डाव होता. तारांचें दळणवळण तोडून, सर्व रस्ते रोखून नि कैद्यांची मुक्तता करून जुलमी इंग्रज सत्ताधाऱ्यांच्या रक्तानें मायभूमीला लागलेलें पारतंत्र्याचें लांछन धुवून काढीत मीरतचे क्रांतिवीर शिपाई 'चलो दिल्ली' च्या घोषणा करीत विजयोन्मादानें निघाले.

एप्रिलअखेर नानासाहेब दिल्लीस गेले होते त्या वेळीं क्रांतिकारकांच्या सर्व पुढाऱ्यांनीं आपापल्या प्रांतांत ३१ मे रोजीं उठाव करावयाचा असें ठरलें होतें. इंग्रजांना जराही पत्ता लागूं न देतां त्या ठरलेल्या दिवशीं सबंध हिंदुस्थान एकसमयावच्छेदेंकरून उठला असता तर ?.... पण तसें व्हावयाचें नव्हतें. मीरतच्या अकाली उठावणीनें क्रांतिकारकांपेक्षां इंग्रजांचाच फायदा झाला. इंग्रज सावध झाले.



# ग्वाल्हेरमध्यें हिंदीराज्य



मीरतचे शिपाई दिल्लीला येऊन थडकल्यावर तेथील सैन्यानें त्यांचें बंधुभावानें स्वागत केलें आणि आपला सेनाधिकारी कर्नल रिप्ले ह्यास गोळी घालून ठार केलें. दिल्लीचा राजवाडा लोकानुवर्ति सैन्याच्या हातीं येऊन पुढील कार्यक्रमाचा विचार सुरू झाला. बादशहानें क्रांतीचें नेतृत्व स्वीकारण्याचें मान्य केलें. १६ मेला दिल्लीमध्यें इंग्लिशांच्या स्वामित्वाची एखादी लहानशी खूणही शिल्लक उरली नाहीं. अनेक शतकांनंतर, ह्यापुढें हिंदु व मुसलमान हे ह्या देशांत भाऊभाऊ म्हणूनच राहाणार, असें भारतानें पहिल्यानेंच घोषित केलें !

दिल्लीच्या विजयाचें वर्तमान हां हां म्हणतां सर्व देशभर समजलें. पूर्वनियोजित कार्यक्रम धाब्यावर बसवून झालेल्या ह्या उठावणीमुळें इतर ठिकाणचे क्रांतिनेते गोंधळून गेले. त्यांना स्वस्थही बसतां येईना कीं उठावणीही करतां येईना. क्रांतिकारकांत निर्माण झालेली ही अपरिहार्य निष्क्रियता इंग्रजांच्या चांगलीच पथ्यावर पडली.

दिल्ली पुन्हा काबीज करण्यासाठीं अंबाल्याहून इंग्रज सैन्य निघालें. ह्या सैन्याला शीखांनीं साहाय्य दिलें व मीरतच्या इंग्रजी सैन्याला गुरख्यांची मदत झाली. हीं दोन्ही सैन्यें एक होऊन दिल्लीजवळ अलीपूर येथें येऊन थडकलीं. क्रांतिकारक सैन्य दिल्लींतून बाहेर पडलें आणि बुंदेल की सराई येथें त्यानें इंग्रज सैन्याशीं युद्ध आरंभिलें. पण इंग्रज सैन्य वरचढ ठरलें व क्रांतिसैन्याला माघार घ्यावी लागली. ८ जूनला संध्याकाळीं दिल्लीच्या तटाभोवतीं इंग्रजांचा वेढा पडला.

क्रांतिकारकांनीं पूर्वीं आंखलेल्या योजनेप्रमाणें ३१ मेला बरेलीमधील इंग्रजांचें निशाण खालीं ओढलें जाऊन त्या दिवशींच्या संध्याकाळपूर्वींच शहाजहानपूरही स्वतंत्र झालें. बरेलीच्या क्रांतिसैन्यानें आपलें आधिपत्य तोफखान्याचा प्रमुख बख्तखान ह्याच्या सूपूर्द केलें होतें. जून ३ अझिमगड, जून ४ बनारस आणि जून ५ जवानपूर, ह्या ठिकाणीं उठावणी झाली.

दिल्ली स्वतंत्र झाल्याची वार्ता कानपूरला १५ मेला थडकली. पण पूर्वीं ठरल्याप्रमाणें जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत वाट पाहाण्याचें नानासाहेब आणि अझिमुल्लाखान ह्यांनीं ठरविलें. ब्रह्मावर्त वरून दिसायला अगदीं शांत दिसत होतें. कानपूरच्या शिपायांनीं उठाव केल्यास आपणांस नानासाहेबांचें साह्यय मिळेल असा कानपूरच्या इंग्रज सेनापतीचा विश्वास. सैन्याच्या उठावणीचा वास आल्याबरोबर त्यानें नानासाहेबांकडे मदतीची याचना केली आणि आपल्या तुटपुंज्या सामुग्रीनिशीं नानासाहेब तात्या टोपेला घेऊन कानपूरला आले. ता. ४ जूनला इंग्रजांनीं आपला खजिना आणि दारूगोळा रक्षिणारें नबाबगंज हें ठाणें नानासाहेबाच्या स्वाधीन केलें. हातीं आलेला खजिना आणि दारूगोळ्याचें कोठार ह्या भांडवलावर नानासाहेबांनीं इंग्रजांशीं छातीठोकपणें युद्ध सुरू केलें. कानपूरच्या इंग्रजांचा पुरा बींमोड करून नानासाहेबांनीं १ जुलैला स्वतःला राज्याभिषेकही करवून घेतला !


कानपूरप्रमाणेंच झांशीची उठावणीही जूनच्या ४ तारखेलाच झाली. क्रांतिकारकांनीं झांशीचा किल्ला ताब्यांत घेतल्यावर इंग्रजांनीं आश्रयाकरितां गांवांतील किल्ल्याची वाट धरली पण क्रांतिकारकांनीं त्यावरही हल्ला करून तो सर केला.

खालसा केलेल्या अयोध्येंत मेच्या ३० तारखेच्या रात्रीं उठावणी झाली. सितापूर, महम्दी, बऱ्हेच, सिकोरा, गोंडा, वगैरे ठिकाणीं एकदम भडका उडाल्यामुळें इंग्रजांना पळतां भुई थोडी झाली आणि १० जूनच्या सुमारास सर्वंच अयोध्याप्रांत स्वतंत्र झाला. अवघ्या दहा दिवसांच्या छोट्या अवधींत अयोध्या प्रांतांतील इंग्रजी राजसत्ता पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणें कोसळून पडली.

ग्वाल्हेर, इंदूर, राजपुताना, भरतपूर, इत्यादि संस्थानांतील जनताही स्वातंत्र्ययुद्धाच्या आवेशानें प्रक्षुब्ध होऊन उठली होती. शिंद्यांनीं देशाशीं नव्हे तर इंग्रजांशीं आपली मैत्री टिकवून धरण्याचा निश्चय केला. जनता संतापानें क्रुद्ध झाली आणि शिंद्यांची पर्वा न करतां आपणच समरासाठीं खडी ठाकली. १४ जूनच्या रात्रीं शिंद्यांच्या प्रदेशांत एकच धमाल उडून राहिली आणि साऱ्या गोऱ्या लोकांना आग्र्याला पळून जावें लागलें. ग्वाल्हेरच्या सैनिकांनीं गोऱ्या अधिकाऱ्यांना कापून काढलें.

ता. ५ जुलै रोजीं आग्र्यांतील लष्करानें उठावणी केली आणि नीमच व नसिराबाद येथील पलटणीही त्यांना येऊन मिळाल्या. इंग्रज सेनेचा ह्या दोन्ही एकत्र झालेल्या सैन्यांशीं सासिहाजवळ सामना झाला. परंतु क्रांतिकारकांपुढें टिकाव धरणें अशक्य होऊन इंग्रज सेनेला माघार घ्यावी लागली.

१० मेपासून ३१ मेपर्यंत उठावणीची एकही लाट उसळलेली न दिसल्यामुळें इंग्रज कांहींसे बेफिकीरच होते. ३१ मेनंतर मात्र लखनौच्या रेसिडेन्सीभोवतीं, कानपूरच्या मैदानांत, झांशीच्या जोगनबागेंत, अलाहाबादच्या बाजारांत, बनारसच्या घांटावर, जिकडे तिकडे आगीचा डोंब



पूल उडवून उध्वस्त करण्यांत आले होते.

उसळलेला दिसूं लागला. तारायंत्रांच्या तारांची मोडतोड झाली होती, पूल उडवून उध्वस्त करण्यांत आले होते, रक्ताच्या नद्यानाल्यांतून इंग्रजांचीं प्रेतें वाहातांना दिसत होतीं ! तेव्हां मात्र कलकत्त्याच्या डोळ्यांवरील झांपड उडाली आणि १२ जूनला इंग्रज नागरिक स्वयंसेवकांचीं पथकें उभारूं लागले. त्या सर्वांना लगोलग सांघिक कवाईत व रायफलीची नेमबाजीही शिकविण्यांत आली.

बराकपूरचे शिपाई उठावणी करणार ही बातमी समजल्याबरोबर नवाबाला आणि त्याच्या मंत्र्याला पकडण्यांत येऊन झनानखान्यासुद्धा सर्वत्र झडती घेण्यांत आली आणि तसें कांहीं आक्षेपार्ह सापडलें नसतांही नवाबाला आणि त्याच्या वजिराला कलकत्त्याच्या किल्ल्यांत डांबून ठेवण्यांत आलें. वजीर नख्वीखान ह्यानें सबंध बंगालभर क्रांतिकारकांचें जाळें विणून ठेवलें होतें पण त्यालाच कैदेंत जावें लागल्यामुळें क्रांतीचा मेंदूच गळून पडल्यासारखें झालें.

दिल्लीला इंग्रजांचा वेढा पडल्यानंतर दिल्लींतील क्रांतिकारक सैन्य रोज सकाळीं बाहेर पडे आणि इंग्रजांशीं मुकाबला करून संध्याकाळीं परत जाई. २० जूनला सकाळीं क्रांतिकारक सेना शहरांतून बाहेर पडली आणि इंग्रजांवर पिछाडीवरून मारा करण्यासाठीं लपत छपत जाऊं लागली. इंग्रजांनीं आपल्या तोफांचा भडिमार सुरू केला पण हिंदी सैन्य त्याला निधडेपणानें तोंड देत राहिलें. संध्याकाळच्या वेळीं हिंदी शिपायांनीं

अधिकच जोरकस चढाई केली. रात्र पडल्यानंतरही युद्ध चालूच होतें. अखेर इंग्रजांना माघार घ्यावी लागली. त्या गडबडींत ब्रिटिश छावणीच्या पिछाडीला असलेली एक अतिशय महत्त्वाची व माऱ्याची भूमि क्रांतिकारकांच्या हातीं आली. ही माऱ्याची जागा पुन्हा परत मिळवीपर्यंत इंग्रजांचें पंजाबशीं असलेलें दळण-वळण संपूर्णतया तुटल्यासारखें होणार होतें. हें जाणून इंग्रज सेनापतीनें दुसऱ्या दिवशीं आपलें शक्तिसर्वस्व खर्चीं घालून तें ठाणें परत जिंकून घेतलें.



हॅवलॉक

दोन्ही पक्षांना दर दिवशीं नवीन सैन्य येऊन मिळत होतें. रोहिल-खंडाचा बख्तखान आपलें सैन्य आणि खजिना घेऊन दिल्लींत आल्याबरोबर सर्व क्रांतिकारक सेनेचें आधिपत्य त्याच्या सुपूर्त करण्यांत आलें. आग्र्याचे शिपाई, नसिराबादच्या तुकड्या, जालंदरचें सैन्य हें सर्व सेनाबल आतां बख्तखानाच्या आधिपत्याखालीं आलें होतें. दिल्ली शहरांत त्या वेळीं माजलेली झोटिंगपाच्छाई त्यानें एकदम बंद केली व प्रजेच्या मनांत आपल्या सुरक्षिततेविषयीं विश्वास निर्माण केला. तिकडे इंग्रजांच्या मदतीला पंजाबमधील पलटणी येऊन दाखल झाल्या होत्या. ता. ४ जुलैला बख्तखान इंग्रजांवर चाल करून गेला आणि त्यांना अलिपूरपर्यंत त्यानें मागें रेटलें.

इंग्लंडचें इराणशीं चाललेलें युद्ध संपलें आणि हॅवलॉकसारखा अत्यंत कुशल सेनापति सर्व इंग्लिश सैन्य हिंदुस्थानांत आणूं शकला. रेनॉडच्या नेतृत्वाखालीं फत्तेपुरावर हल्ला होणार असल्याची बातमी लागतांच नानासाहेबांनीं आपलें सैन्य त्या बाजूला पाठवून दिलें. तें सैन्य इंग्रजांच्या दोन सैन्यांत अडकून पडलें आणि त्याला आपला जीव बचावण्यासाठीं माघार घ्यावी लागली. इंग्रजांनीं उभें फत्तेपूर जाळून टाकलें! कानपूरवर चाल करून येणाऱ्या इंग्रज सैन्याला पांडू नदीवर तोंड देण्याचें



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. (०५१...
शाखा




इंग्रजांनीं उभें फत्तेपूर जाळून टाकलें.

नानासाहेबांनीं ठरविलें. पण त्यांच्या सैन्याला मागें रेटीत हॅवलॉक हळूहळू पुढें सरकत होता. नानासाहेब आपल्या सैन्याला उत्साहित करीत हॅवलॉकशीं सामना देत होते. पण अखेर हॅवलॉकच्या जबर सैन्यापुढें त्यांचें कांहीं चालेना तेव्हां त्यांनीं ब्रह्मावर्ताकडे माघार घेतली आणि १७ जुलैला हॅवलॉकचें विजयी सैन्य कानपुरांत घुसलें. कानपुरच्या पराजयानंतर नानासाहेबांनीं ब्रह्मावर्त सोडलें आणि गंगेपार होऊन ते फत्तेपूरला येऊन थांबले. कानपूरनंतर लखनौ आणि लगेच दिल्ली असें वेळापत्रक मनाशीं ठरवून हॅवलॉक निघाला. २५ जुलैला तो गंगेपार होऊन लखनौवर चालून गेला.

बिहार प्रांत व त्याची राजधानी पाटणा ह्यांतही स्वातंत्र्ययुद्धाचें लोण जाऊन पोचलें होतें. पण तिकडील इंग्रज कमिशनर टेलर ह्यानें क्रांतिकारकांची माहिती मिळवून त्यांना अटक करण्याचें सत्र सुरू केलें. प्रत्येक नागरिकानें आपल्या घरांतील शस्त्रें शस्त्रागारांत आणून सुपूर्द करावीं व रात्रीं नवाच्या नंतर कोणीही आपल्या घराबाहेर पडूं नये असे दोन हुकूम त्यानें पाटण्यांत जारी केले. साहजिकच क्रांतिकारकांच्या बैठकी व शस्त्रांचा संग्रह ह्या दोन्ही गोष्टी अशक्यप्राय होऊन बसल्या. अशा प्रकारचें लाचार जिणें जगण्यापेक्षां एकदम जोराची उठावणी करणेंच बरें असें तेथील क्रांतिकारकांना वाटूं लागलें. सुमारें दोनशें क्रांतिवीरांनीं उघड मिरवणूक काढली व ते चर्चवर चालून गेले. परंतु शीख सैनिकांनीं देशद्रोह केल्यामुळें ते सर्व क्रांतिवीर पकडले गेले.



# ऐशीं वर्षांचा लढवय्या



उरलेसुरले क्रांतिवीर मार्गदर्शनासाठीं जगदीशपूरला जाऊं लागले. त्या ठिकाणीं त्यांना स्वातंत्र्ययुद्धाला योग्य असा नेता लाभणार होता. हा नेता म्हणजे कुमारसिंह होय. त्याचें वय ह्या वेळीं ऐशीं वर्षांचें होतें. त्याचें तेजस्वी मन स्वातंत्र्याच्या दिव्य लहरींनीं भारून गेलेलें असून प्रत्यक्ष रणांगणावर मी मी म्हणणाऱ्या योद्धयांनाही लाजेनें खालीं पाहावयास लावील अशा प्रकारचें सामर्थ्य त्याच्या मनगटांत वसत होतें. कुमारसिंहाचें नानासाहेबांशीं चांगलें सूत होतें. कुमारसिंहाच्या हालचाली टेलरच्या कानांवर जात पण त्याचा त्यांवर विश्वास बसत नसे. तरीही त्यानें कुमारसिंहाला प्रत्यक्ष मुलाखतीसाठीं निमंत्रण पाठविलें. परंतु वृद्धापकाळामुळें आपल्याला जागेवरून हालतांही येत नसल्याचा बहाणा करून त्यानें टेलरच्या डोळ्यांत धूळ फेकली. दाणापूरचे शिपाई त्याला येऊन मिळाल्याबरोबर ऐशीं वर्षांच्या ह्या वीरानें छातीठोकपणें रणांगणावर उडी घेतली. ह्यानंतर शहादाबाद जिल्ह्याचें प्रमुख गांव अऱ्हा येथें शिपाई आले व तेथील खजिना लुटून इंग्रजांनीं व्यापलेल्या किल्ल्याला त्यांनीं वेढा दिला. वेढा तीन दिवस चालू होता. चौथ्या



कुमारसिंह

दिवशीं इंग्रजांना भरभक्कम कुमक आली पण त्या वेळीं त्यांना एकही क्रांतिकारक दिसेना. पण गोळ्यांचा मारा मात्र अविरत चालू होता. आंबराईत, टेकडीवर, वगैरे ठिकाणीं लपून बसून क्रांतिवीर इंग्रज सैन्यावर आगीचा भडिमार करीत होते. इंग्रजांचें फारच थोडें सैन्य ह्या माऱ्यांत जिवंत राहूं शकलें. पण इंग्रजांना आणखी कुमक आली. कुमारसिंहानें आपल्या सैन्याची जमवाजमव केली. २ ऑगस्टला बिबिजंग खेड्याजवळ शत्रूशीं त्यानें सामना दिला, त्यांत त्याचा पराभव झाला आणि अऱ्हाचें ठाणें पुन्हा इंग्रजांच्या हातीं पडलें. कुमारसिंह जगदीशपूरला परतला. जगदीशपूरवर चालून आलेल्या सैन्याशीं त्यानें छातीठोकपणें सामना दिला पण अखेर त्या वृद्ध वीराला जगदीशपूर सोडावें लागलें.

पंजाबचें सैन्य आणि तोफखाना इंग्रजांच्या छावणींत सुखरूपपणें येऊन पोचतांच दिल्लीवरील चढाईची आखणी करण्यांत आली. १४ सेप्टेंबरला इंग्रजांनीं आपल्या सैन्याचे चार विभाग केले. डाव्या बगलेवर तीन व उजव्या बगलेवर एक अशी त्या विभागांची योजना करण्यांत येऊन काबूलचें प्रवेशद्वार फोडून दिल्लींत प्रवेश करण्याचें इंग्रजांनीं ठरविलें. काश्मीर बुरुजांत पडलेल्या खिंडारांतून इंग्रजांचा पहिला सैन्यविभाग



इंग्रजांचा पहिला सैन्यविभाग आंत घुसूं लागला.

आंत घुसूं लागला. क्रांतिकारकांच्या अग्निवर्षावाला न जुमानतां इंग्रज सैन्यानें भलें मोठें खिंडार पाडून आंत घुसण्याच्या कामीं यश मिळविलें. दिल्लीच्या तटावरील सर्व प्रतिकार संपला आणि इंग्रजांनीं विजयाचें रणशिंग फुंकलें. दुसऱ्या सैन्यविभागानें पाणबुरुजाच्या खिंडींतून व तिसऱ्यानें काश्मीर प्रवेशद्वाराच्या भगदाडांतून प्रवेश केला. चौथ्या विभागाला मात्र क्रांतिकारकांच्या सैन्याशीं सामना करीत राहावें लागलें.

आंत शिरलेल्या पहिल्या तुकडीशीं क्रांतिकारकांनीं अशी जबरदस्त झुंज दिली कीं तिचा शूर सेनापति मारला जाऊन तिला सपशेल माघार घ्यावी लागली. जामेमशिदीकडे गेलेल्या दुसऱ्या विभागाचीही अशीच पिछेहाट झाली. ता. १५ ते २४ सेप्टेंबरपर्यंत क्रांतिकारकांनीं लढण्याची शर्थ केली. पण पाऊण दिल्ली इंग्रजांच्या ताब्यांत गेली. सरसेनापति बख्तखान बादशहाला दिल्लीबाहेर पडून इंग्रजांशीं युद्ध चालविण्याची सल्ला देत असतांना बादशहा इंग्रजांना शरण गेला! दिल्लींतील क्रांतिकारक सैनिक वीरांनीं इंग्रजांशीं सामना देऊन १३४ दिवसपर्यंत दिल्ली आपल्या ताब्यांत ठेविली होती.

ता. २० जुलै रोजीं लखनौच्या वेढलेल्या रेसिडेन्सीवर क्रांतिकारकांनीं जोराचा हल्ला चढविला पण त्यांत त्यांना यश आलें नाहीं. १८ ऑगस्टला क्रांतिवीरांनीं आणखी एक हल्ला चढविला. तटाला खिंडार पाडून क्रांतिवीर एकदम आंत घुसले, पण आंतील अग्निवर्षावामुळें त्यांना मागें फिरावें लागलें. लखनौंतील आपल्या बांधवांना साहाय्य करण्याकरितां हॅवलॉक कानपूरहून निघून २९ जुलैला ससैन्य गंगापारही झाला होता. पण त्याला पावलापावलाला क्रांतिकारकांशीं सामना देत यावें लागत होतें.

हॅवलॉक कानपूरहून हालल्याचें समजतांच नानासाहेब कानपूरच्या बाजूला आले. सागर व ग्वाल्हेर येथील क्रांतिकारक त्यांना आतां येऊन मिळाले होते. त्यांना बरोबर घेऊन ते बिठूरकडे चालून गेले आणि त्यांनीं


सर आऊटरॅम

कानपूरला धोका उत्पन्न करून ठेवला. हॅवलॉकला पुन्हा कानपूरला परतावें लागलें. तो कानपूरला दाखल होतांच नानासाहेबांनीं ब्रह्मावर्त हस्तगत केल्याची वार्ता त्याला समजली. तेव्हां तो त्यांच्यावर चालून गेला क्रांतिकारकांचा पराभव करून तो १७ ऑगस्टला कानपूरला परतला. त्याच्याकडे असलेलें सेनापतिपद काढून घेण्यांत येऊन तें सर आऊटरॅम ह्यास देण्यांत आलें. हा नवा सेनापति १६ सेप्टेंबर रोजीं कानपुरास आल्यावर लखनौच्या इंग्रजांना मदत करण्याची कामगिरी त्यानें हॅवलॉकवरच सोपविली. हॅवलॉक २० सेप्टेंबरला गंगापार झाला. वाटेंत आडव्या येणाऱ्या क्रांतिकारकांना कापून काढीत तो २३ सेप्टेंबरला आलमबागेशीं आला. २५ सेप्टेंबरला पूल ओलांडून इंग्रज सैन्य लखनौंत दाखल झालें. रेसिडेन्सींतील इंग्रजांना मदत मिळाली खरी पण आतां हे सगळेच इंग्रज कोंडले गेले. त्यांना १४ नोव्हेंबरला बाहेरची मदत आली. हॅवलॉकनें रेसिडेन्सींतून बाहेर पडून व ह्या नवीन सैन्यानें बाहेरून अशा रीतीनें क्रांतिकारकांवर दोन्ही बाजूंनीं मारा करावयाचा अशी योजना आंखण्यांत आली. २३ नोव्हेंबरपर्यंत लखनौला रणधुमाळी माजून राहिली होती. २४ तारखेस इंग्रज विजयी झाले पण त्याच दिवशीं हॅवलॉकही मरण पावला ! ‘ गड आला पण सिंह गेला ’ ह्याची ही इंग्रजी आवृत्ति होती.

दिल्ली पडली, लखनौ पडलें पण क्रांतियुद्धाचा जोर कांहीं मंदावला नाहीं. इंग्रज सैन्याचा जोर दिवसेंदिवस वाढत होता हें मात्र खरें.



# क्रांतिदेवी लक्ष्मीबाई



१८५७ च्या स्वातंत्र्यसमरांत अनेकांनीं अनेक प्रकारची मर्दुमकी गाजविली हें खरें असलें तरी झांशीची राणी लक्ष्मीबाई व नानासाहेब पेशव्यांचे सेनापति तात्या टोपे ह्यांची कामगिरी केवळ अमोल होती ह्यांत शंका नाहीं.

१८५८ मधील २० मार्चच्या सुमाराला विजयी इंग्रज सैन्य झांशीपासून अवघ्या चौदा मैलांवर येऊन थडकलें होतें. ह्या वेळीं नर्मदेच्या तीरापासून वरपर्यंत सबंध देशभर पसरलेलीं क्रांतिपथकें झांशींत गोळा झालेलीं होतीं. ह्या सर्व क्रांतिकारकांचें एकाच वेळीं कंदन करण्याकरितां सर ह्यू रोज झांशीवर चालून आला. झांशी युद्धघोषणांनीं गर्जत होती. सैन्याचें नेतृत्व राणी लक्ष्मीबाईनें आपणाकडे घेतलें होतें. प्रत्येक तटाची व बुरुजाची ती स्वतः पाहाणी करी. तिच्याकडे पाहून सैन्यांतील प्रत्येक मनुष्य अभिमानानें व देशप्रेमानें ओथंबून जाई. २५ मार्चपासून लढाईला खरें तोंड लागलें. इंग्रजांनीं तोफांचा भडिमार सुरू केला.

२६ तारखेला इंग्रज तोफांच्या माऱ्यामुळें किल्ल्याच्या दक्षिण दरवाजावरील तोफखाना बंद पडला. तेव्हां पश्चिम दरवाजावरील गोलंदाजानें

तोफांचीं तोंडें फिरवून इंग्रजांवर उलट चौफेर मारा करून त्यांच्या तोफांचीं तोंडें बंद केलीं. पांचव्या व सहाव्या दिवशींही लक्ष्मीबाईच्या तोफखान्यानें अक्षरशः प्रलय उडवून दिला. सातव्या दिवशीं झांशींतील डाव्या बाजूची तोफ थांबली व शत्रूच्या माऱ्यानें किल्ल्याची भिंतही अनेक ठिकाणीं ढांसळली. ती राणीनें रातोरात आपल्या समक्ष दुरुस्त करवून घेतली. २१ मार्चपर्यंत राणीनें इंग्रजांची डाळ शिजूं दिली नाहीं. इतक्यांत सेनापति तात्या टोपे आपल्या बावीस हजार सैन्यासह राणीला मदत करण्यासाठीं झांशीला येऊन थडकला. अर्थात् त्याच्याशीं झुंजण्यासाठीं इंग्रज सैन्याला आपलें तोंड बदलावें लागलें. ह्यू रोजनें एकाच वेळीं झांशीवर तोफा डागल्या आणि तात्यांशींही मुकाबला आरंभला. झांशीकडून एकही तोफेचा गोळा सुटेना. तात्यांचें सैन्य युद्धच करीना. अशा परिस्थितींत सेनापति आणि सैन्य ह्या दोघांचाही धुव्वा उडून त्यांना रणांगणांतून पळून जावें लागलें. तात्यांच्या ह्या लज्जास्पद पराभवामुळें राणीची विजयाची आशा पार मावळून गेली. पण तिनें धीर मात्र सोडला नाहीं. ती आपल्या शूर सैनिकांना म्हणाली, " पेशव्यांच्या सैन्याच्या हिंमतीवर का आपण हें युद्ध आरंभलें ? कोणाची मदत आपल्याला मिळो वा न मिळो, माझ्या जिवांत जीव असेपर्यंत मी माझी झांशी शत्रूला मिळूं देणार नाहीं ! " राणीच्या ह्या वीरगर्जनेनें



इंग्रजांचा हल्ला फारच जोराचा होऊं लागला.

तिच्या सैन्याला नवा हुरूप आला व झांशीच्या संरक्षणासाठीं आपली शर्थ करण्याची त्यांनीं वाढत्या जोमानें प्रतिज्ञा केली.

ता. ३ एप्रिलला इंग्रजांचा हल्ला फारच जोराचा होऊं लागला. किल्ल्याच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या रोखानें इंग्रज चढाई करूं लागले. इंग्रज सैन्याच्या एका तुकडीनें दक्षिण दरवाजाचा ताबा मिळवला आणि इंग्रज आंत घुसूं लागले. लवकरच एक तुकडी राजवाड्यापर्यंत जाऊन थडकली आणि झांशी इंग्रजांच्या हातीं पडली.

राणी एका बुरुजावरून हें सारें दृश्य पाहात होती. ती संतापानें बेभान झाली. बरोबर हजार दीड हजार निवडक सैन्य घेऊन व हातांत तलवार धरून राणी दक्षिण दरवाजावर असलेल्या इंग्रज पलटणींत घुसली. अनेक इंग्रज कापले गेले. पण एव्हांना इंग्रजांनीं झांशीची राखरांगोळी उडविली होती. पांच वर्षांच्या लहान बालकापासून ऐशीं वर्षांच्या वृद्ध माणसापर्यंत जो कोणी त्यांच्या हातीं सापडला त्याची कत्तल करण्यांत आली. सबंध शहरांत आगी लावण्यांत आल्या. राणीनें हें हृदयद्रावक दृश्य पाहिलें तेव्हां तिचे डोळे पाण्यानें भरून आले. झांशीवर फिरंग्यांचें निशाण फडकलेलें तिच्या डोळ्यांना दिसलें. इतक्यांत तिचे शूर गोलंदाज सरदार कौर खुदाबक्ष व गुलाम घोषखान हे दोघेही इंग्रजांच्या गोळ्या लागून मृत्युमुखीं पडल्याची दुःखद वार्ता तिच्या कानीं आली.



राणी इंग्रज पलटणींत घुसली.




राणी रणांगणावर विजेसारखी तळपूं लागली.

रात्रीच्या वेळीं निवडक स्वार बरोबर घेऊन राणी पुरुषवेषानें झांशीच्या बाहेर पडली व काल्पीच्या रोखानें निघाली. दोन रात्री व एक दिवस जवळ जवळ सतत दौड करून ती मुक्कामाला पोचली. पुढील युद्ध-योजनेसंबंधीं राणी आणि तात्या टोपे ह्यांच्या वाटाघाटी चालू झाल्या. पेशव्यांचें सैन्य घेऊन राणी काल्पीपासून बेचाळीस मैलांवर असलेल्या कुंचगांववर चाल करून गेली. पण ह्या युद्धांत क्रांतिकारकांचा पराभव होऊन त्यांना काल्पीपर्यंत माघार घ्यावी लागली. सर ह्यू रोज काल्पीवर चालून आला. राणी हातांत तलवार घेऊन रणांगणावर विजेसारखी तळपूं लागली. इंग्रजसेनेला तिचा मारा सहन करवेना. राणीनें व तिच्या घोडदळानें आग ओतणाऱ्या तोफांवरच सरळ हल्ला चढविला आणि तोफखाना हस्तगत केला. सर ह्यूजला माघार घ्यावी लागली. लवकरच आपलें राखीव उंटदळ घेऊन त्यानें पुन्हा चढाई केली. पण त्यापूर्वीच रावसाहेब, राणी लक्ष्मीबाई, वगैरे नेते मंडळी अज्ञातस्थळीं निघून गेली होती. ग्वाल्हेरच्या जनतेला उठवून तिच्याकडून क्रांतिकार्यांत साहाय्य करण्याचें वचन मिळविण्यांत आलें असल्याची वार्ता कळतांच राणी लक्ष्मीबाईनें ग्वाल्हेरवर चालून जाण्याबद्दल पेशव्यांना गळ घातली. २८ मेला पेशव्यांनीं ग्वाल्हेर घेतलें आणि १ जूनला शिंदे त्यांच्यावर चालून आला. राणी आपल्या तीनशें स्वारांसह शिंद्याच्या तोफखान्यावर तुटून पडली. शिंदे आग्र्याकडे पळत सुटला! ता. ३ जून रोजीं रावसाहेबांनीं पेशवाईचीं वस्त्रें परिधान केलीं.



राणी एकाकी लढत होती.

सर ह्यू रोज निवडक सैन्य बरोबर घेऊन व शिंद्याला पुढें घालून लवकरच ग्वाल्हेरवर चालून आला. राणीनें इंग्रज सैन्याला चांगलेंच झोडपून काढलें. १८ जूनला इंग्रज वाढत्या त्वेषानें चालून आले. राणी पुन्हा शौर्यानें लढूं लागली. इंग्रजांचे दोन हल्ले तिनें मोठ्या शर्थीनें परतविले. पण त्याच वेळीं आपल्या पिछाडीकडूनही इंग्रज सैन्य येत असतांना तिला दिसलें. आपल्या तलवारीच्या वारानें शत्रूंचे कंठनाळ चिरीत राणीनें आपला घोडा दौडविला. वाटेंत एक ओढा आला आणि तिचा घोडा थबकला. तिच्या पाठीवर शत्रु येऊन भिडला होता. राणी एकाकी लढत होती. राणी रक्तानें न्हाऊन निघाली. तिच्या डोक्यावर कोणातरी नतद्रष्टानें मागल्या बाजूनें वार केला. तिचा उजवा डोळाही लोंबूं लागला. रामचंद्र देशमुख ह्या तिच्या एकनिष्ठ सेवकानें राणीला जवळच्या एका झोपडींत उचलून नेलें. रक्तानें थबथबलेली ही रणदेवता शय्येवर पडल्या-क्षणींच तिचा आत्मा पार्थिव शरीराचा त्याग करून स्वर्गलोकीं निघून गेला. मी मी म्हणणारे वीर तिच्या स्मृतीस आदरानें वंदन करतांना स्वतःला धन्य मानूं लागले !



# सेनापति तात्या टोपे



ह्या स्वातंत्र्यसमरांतील दुसरा खंदा वीर म्हणजे पेशव्यांचा सेनापति तात्या टोपे. नानासाहेबांनीं स्वतःला कानपूर येथें राज्याभिषेक करवून घेतला त्यानंतर पंधरा दिवसांच्या आंतच इंग्रज सेनापति त्यांच्यावर चालून आला. लष्कर व रणसाहित्य ह्या दोहोंतही इंग्रज वरचढ ठरल्यामुळें नानासाहेबांना त्या युद्धांत माघार घ्यावी लागली. कानपूरहून निसटतांना नंतरच्या योजना आंखण्याची कामगिरी त्यांनीं तात्या टोपे ह्यांच्यावर सोपविली. अशा प्रकारें सेनापतिपद प्राप्त झाल्यानंतर त्या स्वातंत्र्ययुद्धांत तात्यांनीं जी थोर कर्तबगारी करून दाखविली ती कोणालाही आश्चर्यानें थक्क करील अशीच होती.

तात्यांचे पहिले तीन महिने योग्य ती आंखणी करण्यांतच गेले. कानपूर येथें त्या वेळीं जनरल विंडहॅम हा एकच इंग्रज सेनापति होता. तेव्हां त्याच्यावरच आपली पहिली धडक मारण्याचें तात्यांनीं ठरविलें आणि कानपूरपासून ४६ मैलांवर असलेल्या काल्पीच्या किल्ल्यांत ता. ९ नोव्हेंबरला आपला तळ ठोकला. कानपूरच्या आसपासचीं खेडीं हस्तगत करण्याचा

सपाटा त्यांनीं सुरू केला आणि विंडहॅमला हुलकावणी देत देत तात्यांनीं खुद्द कानपूरही लवकरच जिंकलें.


तात्यांजवळ आतां दहा हजार हिंदी शिपाई होते. इंग्रज सेनापति सर कॉलिन ता. १ डिसेंबरला त्यांच्यावर चालून आला. तात्यांचा पराभव झाला आणि त्यांना नानासाहेबांसह माघार घ्यावी लागली. ता. ९ डिसेंबरला शिवराजपूरजवळ इंग्रज सेनानी होप ग्रँट ह्याच्याशीं मुकाबला करण्याचा प्रसंग तात्यांवर आला. ह्या लढाईतही तात्यांना माघार घ्यावी लागली व आपला तोफखाना इंग्रजांच्या स्वाधीन करून जिवानिशीं निसटून जावें लागलें. नानासाहेबांना घेऊन तात्या गंगेपार झाले आणि कांहीं दिवसांनीं त्यांनीं एकट्यानेंच काल्पीजवळ यमुना नदी ओलांडली. आपणास हवें असलेलें साहाय्य देण्याचें चरखारीच्या राजानें नाकारतांच पेशव्यांचा सेनापति ह्या नात्यानें तात्यांनीं त्याच्या राजधानीवर हल्ला केला आणि २४ तोफा व तीन लक्ष रुपये खंडणी त्याच्याकडून घेतली. ह्याच वेळीं झांशीच्या वेढ्याचा आठवा दिवस उजाडला होता आणि झांशीची राणी



तात्या टोपे



सर कॉलिन



तात्यांनीं २४ तोफा व तीन लक्ष रुपये खंडणी घेतली.

लक्ष्मीबाई हिनें तात्यांना आपल्या साहाय्यार्थ बोलावलें होतें. त्याप्रमाणें तात्यांनीं आपला मोर्चा झांशीकडे वळविला.

झांशीला वेढून बसलेल्या इंग्रज सेनेला पिछाडीच्या बाजूनें घेरण्याची योजना तात्यांनीं आंखलेली होती. पण इंग्रज सेनापति ह्यू रोज ह्यानें झांशीवर आणि आपल्या पिछाडीकडून येणाऱ्या तात्यांवर एकाच वेळीं निकराचा हल्ला चढविला. तात्यांच्या सैन्याची दाणादाण उडून त्यांना माघारीं फिरावें लागलें.

नंतर तात्यांनीं गोपालपूरच्या क्रांतिकारकांची भेट घेतली. त्यानंतर ग्वाल्हेरच्या कांहीं सरदारांना त्यांनीं आपल्या योजनेंत ओढून घेतलें आणि खुद्द शिंद्यांनाही आपल्याला येऊन मिळण्याबद्दल सुचविलें. पण शिंदे वळत नाहींतसें पाहून तात्यांनीं ता. १ जून रोजीं ग्वाल्हेरवर हल्ला चढविला. तात्या समोर दिसतांच शिंद्यांच्या लष्करानें लढण्याचें नाकारलें आणि सर्व लष्कर तात्यांना येऊन मिळालें. शिंदे आपल्या दिवाणासह आग्र्याकडे पळत सुटले.

ठिकठिकाणीं अपयशाचें धनी व्हावें लागल्यामुळें गलितधैर्य झालेल्या क्रांतिकारकांना पुन्हा उत्साहित करण्याच्या दृष्टीनें ग्वाल्हेरच्या ह्या विजयाचें महत्त्व विशेष होतें. ह्या वेळीं राणी लक्ष्मीबाई तात्यांबरोबरच होती. इंग्रज सेनापति ह्यू रोज ह्यानें शिंद्यांना पाठीशीं घालून ग्वाल्हेरच्या परिसरांत घनघोर युद्ध आरंभिलें. ग्वाल्हेरच्या पूर्व दरवाजाजवळ लढत असलेल्या लक्ष्मीबाईनें इंग्रजांचे अनेक हल्ले मोठ्या शिताफीनें परतविले. परंतु ता. १८ जूनला इंग्रजांनीं तिचा पराभव केला आणि ता. २० जूनला तात्यांनाही पराभव पत्करावा लागला. पण इंग्रजांची फळी फोडून निसटतांना त्यांनीं आजूबाजूचें जंगल पेटवून देऊन विजयी इंग्रजांना त्राहि भगवन् करून सोडलें.

तात्यांजवळ आतां सैन्याचें किंवा द्रव्याचें फारसें पाठबळ नव्हतें पण स्वातंत्र्यप्रेम व सर्वस्वाचा त्याग करण्याची तयारी हीं मात्र भरपूर प्रमाणांत

होतीं. एतद्देशीय लहान लहान राजांकडून खंडणी घ्यावयाची व त्या द्रव्याच्या जोरावर शक्य तेवढ्या सैन्याची उभारणी करावयाची हा उद्योग त्यांनीं आतां सुरू केला. इंग्रज सैन्याशीं दोन हात करण्याचे प्रसंग त्यांच्यावर अधूनमधून येतच होते. त्यांचा मुक्काम भिलवाडा येथें असतांना रॉबर्ट्स् नांवाच्या एका इंग्रज सेनापतीनें त्यांच्यावर हल्ला केला. तात्यांनीं शिस्तीनें माघार घेऊन चंबळा नदी ओलांडली व झालरापट्टण संस्थानावर स्वारी केली. तेथील राजाकडून त्यांनीं ३२ तोफा व बराच दारूगोळा मिळवून पंधरा लाख रुपयांची खंडणीही घेतली.



रॉबर्ट्स्

ह्या वेळीं तात्यांची परिस्थिति अतिशय विकट झालेली होती. रॉबर्ट्स्, होम्स, पार्क, मिचेल, होप ग्रँट व लॉकहार्ट हे सहा इंग्रज सेनानी तीन निरनिराळ्या दिशांनीं तात्यांना पकडण्यास धडपडत होते. नर्मदा ओलांडून दक्षिणेंत उतरण्याचा तात्यांचा मनसुबा होता ह्याचा वास त्यांना लागलेला होता आणि कांहीं झालें तरी तात्यांना नर्मदेपार होऊं द्यावयाचें नाहीं असा त्यांचा कृतनिश्चय होता. तात्याही पक्के मुरब्बी होते. उत्तर हिंदुस्थानांत वर वर जात असल्याचा बहाणा करीत करीत त्यांनीं अखेर इंग्रजांच्या डोळ्यांत धूळ फेकली व झंझावाताच्या वेगानें दौड करून ते अतिशय थोड्या अवधींत नर्मदेच्या तीरावर येऊन पोचले. ता. २६ ऑक्टोबर १८५८ ला त्यांनीं नर्मदा ओलांडली आणि ते नागपूर प्रांतांत उतरले.




ब्रिगेडिअर हिल

पण नागपूर, खानदेश आणि गुजराथ हे तीनही रस्ते ब्रिगेडिअर हिल, ह्यू रोज आणि रॉबर्ट्स् ह्या

तीन सेनापतींनीं रोखून धरले असल्याचें तात्यांच्या प्रत्ययास आलें. त्यामुळें दक्षिणेस नर्मदा व पूर्वेस अवघड चढ अशा कैचींत ते सापडले. त्यांनीं पुन्हा नर्मदा ओलांडली. त्यांचा बेत होता बडोदें गांठण्याचा, पण तें त्यांस शक्य झालें नाहीं. तेव्हां ते उदयपूरच्या वाटेला लागले पण थोड्याच वेळानें त्यांना इंग्रजी सैन्याचा तट लागल्यामुळें ते थिलवाड्याच्या जंगलांत घुसले पण ता. २१ जानेवारीला त्यांना सिखार येथें इंग्रजांशीं दोन हात करावे लागले आणि त्या वेळीं जबरदस्त पराभव खाना लागला.



# दगलबाजीची कीड



ह्या सुमारास नानासाहेबांचे पुतणे रावसाहेब ह्यांचें व तात्यांचें जमेनासें झालें होतें. अखेर तात्यांनीं रावसाहेबांना सोडलें व ते परोणच्या जंगलांत राहूं लागले. इंग्रजांचे हेर रात्रंदिवस त्यांच्या पाळतीवर असल्यानें ही बातमी इंग्रजांना लवकरच समजली व तात्यांना पकडून देण्यासाठीं त्यांनीं एक लक्ष रुपयांचें बक्षीस जाहीर केलें. रॉबर्ट नेपिअर आपल्या पंचवीस हजार फौजेसह परोणच्या जंगला-जवळ तळ ठोकून राहिला होता आणि त्या तळापासून अगदीं थोड्याच अंतरावर तात्या जवळजवळ एकाकी वावरत होते. असें असूनही त्यांना पकडणें इंग्रजांना जमेना तेव्हां त्यांनीं आपल्या भात्यांतल्या अस्त्राचा—फितुरीचा—अवलंब करण्याचें ठरविलें.


रॉबर्ट नेपिअर

ग्वाल्हेरच्या राजाविरुद्ध पूर्वी ज्यानें बंड केलें होतें तो मानसिंग तात्यांजवळ अनेक दिवस राहिलेला असून त्याला त्यांचा ठावठिकाणा नक्की माहीत असतो

हें इंग्रजांना समजलेलें होतें. ह्या मानसिंगाला फितविण्याची कामगिरी रिचर्ड मीड ह्या इंग्रज सेनानीनें आपल्या शिरावर घेतली.

ता. ११ मार्च रोजीं मानसिंगाचा एक मित्र नारायणसिंग ह्यास मीडनें मोठ्या गौरवानें पाचारण करून आणलें व आपल्या आदरातिथ्यानें त्याला अगदीं गार करून टाकलें. मीडसंबंधानें त्याच्या मनांत स्नेहभावना निर्माण झाली आणि त्यानें मानासिंगाची मीडशीं मुलाखत घडवून आणली. पहिल्यानें मानासिंग वळेना. तेव्हां मीडनें त्याच्या बायकामुलांचा पत्ता काढून त्यांस आपल्या ताब्यांत घेतलें. तेव्हां मात्र मानसिंग घाबरून गेला आणि त्यानें मीडची भेट घेतली. ग्वाल्हेरच्या दरबाराकडून अभय मिळवून देण्याचें मीडनें त्याला आश्वासन दिलें. मात्र ह्या उपकाराच्या मोबदल्यांत त्यानें तात्यांना इंग्रजांच्या स्वाधीन करावें असा मीडनें त्याच्या मागें लकडा लावला. त्याला इतरही अनेक प्रलोभनें दाखविण्यांत आल्यावर त्याच्या जिभेला पाणी सुटलें व तात्यांशीं निमकहरामी करण्यास त्याचें मन तयार झालें.

इंग्रज आपल्या पाठीवर आहेत हें तात्यांना माहीत असल्यामुळें त्यांच्या बाबतींत त्यांनीं अतिशय सावधगिरी बाळगली होती. पण मानसिंगासारखा आपला सहकारी अस्तनींतील निखारा बनला असल्याची कल्पनाही त्यांच्या मनाला शिवली नव्हती. आपल्या सेनेला येऊन मिळण्याविषयीं निरनिराळ्या क्रांतिकारकांचे निरोप तात्यांना रोजच्या रोज येत असत. पण मीडची मुलाखत आटोपल्यावर मानसिंग त्यांना पहिल्यानें भेटला तेव्हां आणखी निदान तीन दिवस तरी आपल्या सध्याच्या ठिकाणावरून आपण हलूं नये असा त्यानें त्यांस सल्ला दिला. तेवढ्या अवधींत इंग्रजांचे हस्तक तात्यांना घेरतील अशी व्यवस्था त्यानें केली !

इंग्रज हस्तकांना घेऊन मानसिंग ता. ७ एप्रिल १८५९ ला संकेतस्थळीं गेला आणि त्यानें तात्यांचें निवासस्थान त्यांना दाखविलें. त्या वेळीं तात्यांना स्वस्थ झोप लागलेली होती. पण त्या हस्तकांची थोडीशी



शस्त्राला हात पोचण्यापूर्वीच त्यांच्या मनगटांत बेड्या ठोकल्या गेल्या.

चाहूल लागतांच ते जागे झाले. पण ते उठून उभे राहाण्यापूर्वींच गनीम त्यांना येऊन भिडले होते आणि तात्यांचा हात शस्त्राला पोचण्यापूर्वींच त्यांच्या मनगटांत बेड्या ठोकल्या गेल्या.

१८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धांत अनेक क्रांतिकारकांनीं आपापल्या परीनें भाग घेतला असला तरी राजकीय अस्वस्थता टिकवून धरली होती ती तात्यांनींच. त्यांच्या अटकेनंतर त्या वेळच्या स्वातंत्र्ययुद्धाची ज्योत सपशेल विझली.



# मरणांत खरोखर जग जगतें



लष्करा न्यायालयांत त्यांच्यावर खटला भरण्यांत आला. झांशी आणि ग्वाल्हेर येथें आणि सर्व-साधारणपणें ब्रिटिश सरकारविरुद्ध, बंडांत भाग घेतल्याचा आणि युद्ध केल्याचा आरोप त्यांच्यावर ठेवण्यांत आला. त्यांना त्यांच्या बचावाची सवलत देण्यांत आली तेव्हां ते म्हणाले, "मला हें पक्कें माहीत आहे कीं इंग्रजांविरुद्ध लढल्याबद्दल मला मरावें लागणार आहे. मला कोणतेंही न्यायालय नको आणि ह्या खटल्यांत भाग घेण्याची माझी इच्छा नाहीं." १९३० च्या स्वातंत्र्याच्या लढ्यांत ज्यांच्या विरुद्ध खटले भरण्यांत आले त्यांनीं ह्याच शब्दांनीं न्यायालयांत उत्तरें दिलीं.

तात्यांचा खटला तीन दिवस चालला. ता. १८ एप्रिल १८५९ रोजीं खटल्याचें काम संपलें आणि त्यांना फाशीची शिक्षा ठोठावण्यांत आली. लगेच त्या शिक्षेची अंमलबजावणी करण्याचा हुकूम सुटला. संध्याकाळीं चार वाजण्याच्या सुमारास त्यांना साखळदंडांनीं जखडून वधस्तंभाकडे नेलें. लोहारानें त्यांच्या शृंखला तोडून टाकल्यावर तात्या शांतपणें पावलें टाकीत पायऱ्या चढून स्तंभाशीं गेले. त्यांचे हातपाय बांधण्यासाठीं पुढें



" मला कोणतेंही न्यायालय नको. "

आलेल्या मांगाला तसें कांहीं करण्याची जरूर नाहीं असें त्यांनीं सांगितलें आणि आपल्या हातांनीं आपली मान फासांत अडकवून घेतली. क्षणार्धांत फास आवळला गेला, तात्यांच्या पायांखालची फळी दूर झाली आणि त्यांचें शरीर खड्डयांत लोंबकळूं लागलें. पूर्वी स्वर्गांत गेलेल्या स्वातंत्र्यवीरांच्या मेळाव्यांत तात्या दाखल झाले. इंग्रजांची राजवट सुरू झाल्यावर हिंदी जनतेनें पहिला स्वातंत्र्याचा लढा दिला त्यांतील सेनापति तात्या टोपे आपल्या वीर मरणानें चिरंजीव झाले.

स्वातंत्र्याकरितां लढणारे आणि लढाईचा इतिहास लिहिणारे ह्यांच्या भूमिकांमध्यें फार मोठा फरक असतो. ज्याप्रमाणें ' युद्धस्य कथा रम्या ' म्हणजे युद्धाच्या गोष्टी चटकदार असतात असा एक वाक्प्रचार आहे, त्याप्रमाणेंच दुसरा एक वाक्प्रचार सुरू करण्याजोगा आहे. यशापयशाची मीमांसा करणाराला युद्धाच्या वेळीं दोनही बाजूंस काय घडलें हें माहीत असतें. पत्ते खेळतांना दुसऱ्या पक्षाच्या हातांतील पत्ते जर खेळाडूला समजतील तर तो हमखास यश मिळवील. पण वस्तुस्थिति तशी नसते. प्रेक्षकाची भूमिका करणाऱ्या त्रयस्थाला दोनही बाजूंचीं पानें पाहातां येतात आणि तो थोडासा ज्ञाता असेल तर आपल्या मनांत कांहीं आडाखे बांधीत राहातो. अर्थात् ते खेळाडूपेक्षां जास्त शहाणपणाचेच असणार, कारण त्याचें ज्ञान दोनही पक्षांच्या हातांतील पानांबद्दल असतें. प्रत्यक्ष खेळाडू आणि प्रेक्षक त्रयस्थ ह्यांच्यामधील फरक हाच स्वातंत्र्यासाठीं लढणारे आणि इतिहास लिहिणारे ह्यांच्यांत फरक असतो.



देशगौरव सुभाषचंद्र

सन १८५७ चा स्वातंत्र्याचा प्रयत्न अयशस्वी झाल्यामुळें कोठें चुकलें हें सांगण्यासाठीं अनेक चिकित्सक पुढें आले. तो प्रयत्न केवळ कांहीं असंतुष्ट राजेरजवाडे आणि शिपाई ह्यांनींच केला होता, सर्वसाधारण जनतेचा त्याच्याशीं संबंध नव्हता म्हणून तो प्रयत्न फसला असा सोपा निर्वाळा देण्याची सहज प्रवृत्ति आपणास दिसते. आपल्या लोकांनीं-सुद्धा दीर्घकालपर्यंत त्या प्रयत्नाला बंड ह्या नांवानेंच ओळखलें. ह्याचें कारण ही प्रवृत्ति होय. मागाहून शहाणा होणें हें अगदीं सोपें असतें. सर्वसाधारण जनतेंत जागृति करून नंतर स्वातंत्र्याचा प्रयत्न करणें हा सांगावयाचा सिद्धान्त झाला. वस्तुस्थितींत हा सिद्धान्त मुळींच अनुभवास येत नाहीं. कांहीं थोड्या लोकांनीं स्वातंत्र्याच्या प्रयत्नाला सुरुवात करावी लागते आणि त्यांनीं चिकाटी धरून थोडेंसें यश मिळविलें तरच त्या प्रयत्नाला आणखी लोकांचें साहाय्य मिळतें. १८५७ चें स्वातंत्र्ययुद्ध यशस्वी झालें नाहीं पण त्यापासून होणारी स्फूर्ति कायमच राहिली. विशेषेंकरून राणी लक्ष्मीबाई पुराणकालीन दुर्गा किंवा महिषासुरमर्दिनी ह्यांची कलियुगांतील प्रतिमा होऊन गेली असें म्हणावयास हरकत नाहीं. देशगौरव सुभाषचंद्र बोस ह्यांनीं तिच्या स्फूर्तिदायक नांवाचा भरपूर उपयोग करून घेतला हें दुसऱ्या महायुद्धकालासंबंधींच्या पुस्तकांत स्पष्ट होईलच.



उच्च ध्येय गांठण्याच्या प्रयत्नांतील अपयश तुटपुंज्या प्रयत्नांतील यशापेक्षां महनीय असतें. राणी लक्ष्मीबाई आणि तात्या टोपे ह्यांच्या मृत्यूमुळेंच गोविंदाग्रजांस

**मरणांत खरोखर जग जगतें**

... कविता प्रसवण्याची स्फूर्ति झाली.



REFBK-0008061